# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२९**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे
व्ही. पी. एम्.
दिशा
वर्ष नववे / अंक ५ / मे २००८

## संपादकीय

## क्रियेवीण वाचाळ माणसे

आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्व देऊन विषय मोठे करायचे आणि असे अवास्तव महत्त्व देत असताना महत्त्वाचे ठरतील, अग्रक्रमाने हाताळणे गरजेचे ठरतील असे विषय नजरेआड करायचे, उद्यावर ढकलत राहायचे हा खेळ आपल्या येथे अव्याहतपणे चालू आहे. या खेळाचे एक चांगले (!) फलित, लोक नेहमी गोंधळलेले राहतात हे असते. हे फलित तापल्या तव्यावर पोळी भाजू पाहणारे जे लोक असतात त्यांना हवे असते ! हे खेळिये अनेक मुखवटे घेऊन समाजात मिरवत असतात. दिल्ली मधले असोत की गल्लीमधले नेते, तथाकथित राजकीय मंडळी, माध्यमातली माणसे तर कधी चित्रपटवाले, खेळवाले असे अनेकजण समाजाची प्रगती (आणि गती देखील) रोखून ठेवत असतात.

यामुळे जीवनातले कोणतेही क्षेत्र घेतले तरी आम्ही पिछाडीवरच राहतो. देश म्हणून विकसित न होता विकसनशीलच राहतो; आणि यातच धन्यता मानतो. वर्तमान पत्र उघडून कोणतीही बातमी बघा केवळ वल्गना, घोषणा, आश्वासने किंवा पोकळ गप्पांनी भरलेल्या बातम्या असतात. विषय कोणताही असो, अगदी मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र असो की विमानतळ असो, महागाईची झळ असो की राजकीय नेत्यांना ठोठावण्यात आलेले दंड असो... वर्षानुवर्षे केवळ चर्चेची गुऱ्हाळे चालू राहतात. सर्व विषयांवर धोरण एकच, ''आज करे सो कल करे -----'' कृती करायची वेळ आली की 'मांजराच्या गळ्यात' या गोष्टीसारखी गत होणारेच जास्त. त्यामुळे निर्णयच घेतले जात नाहीत, घेतले गेलेच तर फायलींचे ढीग बनतात, कार्यवाही होत नाही. कागदोपत्री व्यवहार जास्त !

एक साधी बाब आहे, शिक्षण संस्थांना स्वायतत्ता ! पण किती वर्षे फक्त विचारच चालू आहेत. ज्या महाराष्ट्रात चांगल्या शिक्षण संस्थांची परंपरा आहे, तेथील संस्थांना स्वायतत्ता दिली तर शिक्षणाची प्रगती होईल. पण, असे झाले तर संबंधितांचे काय? त्यामुळे सर्व लहानमोठ्या प्रशासकीय अडचणींवर मात करत जी स्वायतत्ता देता येऊ शकते, तो विषय 'भिजत' ठेवायचा ही मानसिकता.

या सर्व प्रक्रियेमध्ये आजच्या पिढ्यांचे होणारे नुकसान ही बाब आज लक्षात येणारी नाही. पाच पन्नास वर्षांनी झालेले नुकसान किती अपरिमित आहेत कळेल. तेव्हा, पायाखालील जमीन सरकेल. पण, जगातला कोणताही श्रीमंत

(पृष्ठ क्रमांक ४० वर)



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा






**वर्ष नववे / अंक ५ / मे २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ११वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | जगद्‌गुरू श्री शंकराचार्यांची दोन स्तोत्रे | आशा भिडे | ३ |
| २) | देखण्या निसर्गाचा अविस्मरणीय आविष्कार अंदमान निकोबार बेटांचा समूह | श्री. पुनम सिंगवी | ७ |
| ३) | ठाण्याची ब्राह्मण सभा | श्री. सुरेंद्र लागू | १२ |
| ४) | श्री संत नरहरी सोनार | श्री. शं. बा. मठ | १६ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | २२ |
| ६) | मृत्यू | सौ. मोनिका दिलीप कुवर | २९ |
| ७) | सफर - कुबेरनगरीची | सौ. सुनीता जयंत खरे | ३१ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपर्क
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# जगद्गुरू श्री शंकराचार्यांची दोन स्तोत्रे

*श्री शंकराचार्यांनी रचलेल्या स्तोत्रांचे महत्त्व व त्यातील काही भागाचे विवेचन या लेखात वाचावयास मिळते. श्रीमती आशाताईंचा हा अनुभव आहे. दिशाचे लेखक श्री. शंकरराव मठ यांनी संपादित, संग्रहित केलेल्या अरविंद प्रकाशनाच्या पुस्तकाचे स्तोत्रे अनुपषब्ध असण्याची उणीव दूर झाली आहे. पुस्तकाचे नाव श्रीमत आद्य शंकराचार्यांची निवडक स्तोत्रे असे आहे - संपादक*

आचार्यांनी अनेक महान ग्रंथाप्रमाणेच अनेक देवतांची स्तोत्रे, वेदान्त, भक्ती, अध्यात्म, वैराग्य व उपदेशपर रचना केल्या आहेत. त्यांच्या सहज सोप्या सुलभ रचनेमुळे विशेष संस्कृत न येणाऱ्यालाही त्यांचा अर्थबोध होतो. भाषा प्रसादपूर्ण ओजस्वी, नादमधुर आहे. त्यात पांडित्य नाही पण शब्दलालित्य आहे. यमक अनुप्रास इत्यादी शब्दालंकार आहेत. अंत:करणाची तळमळ आहे.

त्यांच्या अनेक बोधपर लहान लहान रचनांपैकी ''चर्पटपंजरिका'' व ''द्वादशपंजरिका'' ह्या दोन रचना मानवाच्या ''यावत चंद्रदिवाकरौ'' अशा बोधपर व मार्गदर्शनपर आहेत.

अती प्राचीन काळी सनातन धर्म अतिशय दु:स्थितीला येऊन नामशेष होण्याच्या मार्गाला लागला असता त्या धर्माच्या पुनरुज्जीवनार्थ प्रत्यक्ष भगवान शंकर, सर्वश्रेष्ठ तत्वज्ञानाचे प्रवर्तक, जगद्गुरु श्रीमान् आद्य श्रीशंकराचार्यांच्या रूपाने या भरतभूमीवर अवतरले अशी हिंदुधर्मीयांची श्रद्धा आहे.

आपल्या नियोजित अवतार कार्यार्थ भारतभर पर्यटन करीत असता एकदा त्यांचा काशीक्षेत्री मुक्काम होता. एका प्रात:काळी ते गंगातटाकी स्नानासाठी जात असता त्यांना ''डुकृञ् करणे'', ''डूकृञ् करणे'' असा व्याकरणांतील धातुपाठ घोकण्याचा आवाज ऐकू आला. आवाजाच्या अनुरोधाने जवळ जाऊन पाहतात तर एक अतिवृद्ध गृहस्थ पाठांतरात मग्न असलेले दिसले. आयुष्याच्या संध्येला हा मूर्ख वृद्ध भगवत् चरणी लीन होण्याचे सोडून त्याच्या ऐवजी हा निरुपयोगी उद्योग करताना पाहुन आचार्यांचे अंत:करण व्यथित झाले. त्यांनी त्याला तळमळीने अमृताहून गोड असा उपदेश केला. तोच, ''चर्पटपंजरिका'' व ''द्वादशपंजरिका''.

'चर्पटपंजरिका' भगवत् भक्तिपर आहे तर दुसरे 'द्वादशपंजरिका' ज्ञानवैराग्यपर आहे.

माहेरी गेले असतांना आईचे (जी नुकतीच ८४ वर्षाची होऊन निवर्तली) पुस्तकाचे कपाट आवरताना ही स्तोत्र पुस्तिका हाती लागली. आईचा (प्रा. उषा लिमये) पुस्तक खजिना खूप मोठा आहे. तिने लिहिलेले साहित्यही खूप मोठे आहे. तिने स्वत:च तो सर्व खजिना मागेच माझ्या स्वाधीन केला होता. ही पुस्तिका चाळतांना त्यातली बरीच स्तोत्रे मला आजही पाठ आहेत असं लक्षात आलं. कारण आई नेहमी ती म्हणायची. लहानपणापासून आमच्या कानावर ते पडल्यामुळे मधून मधून आम्हालाही पाठांतर घडले.

पुनरपि जननम् पुनरपि मरणम् ।

पुनरपि जननी जठरे शयनम् ॥

हा अगदी नेहमीचा तोंडावर असलेला श्लोक या 'चर्पटपंजरितला' असल्याचं आज माझ्या ती पुस्तिका चाळताना लक्षात आलं.

पूर्वी क्वचित म्हटली जाणारी पण आजच्या पिढीला

माहितही नसलेली ही अमूल्य अशी स्तोत्र पुस्तिका सर्वांना माहित व्हावी व तिचा उपयोग सर्वांना व्हावा या हेतूने त्याचा परिचय करून देत आहे.

''चर्पट'' म्हणजे खमंग किंवा खुसखुशीत व 'पंजरि' म्हणजे रुचकर असे पंचखाद्य. 'चर्पटकंजरिका' म्हणजे 'खमंग खाद्य'. या स्तोत्रांना काही ठिकाणी 'मोहमूद्गर' म्हणजे प्रापंचिक मोहावर प्रहार करणारे मुसळ असे म्हटले आहे.

जनमानसातील विषयोपभोगाची आसक्ती कमी होऊन विवेक जागृती होऊन ईश्वरचरणी लीन होण्याच्या दृष्टीने या स्तोत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या स्तोत्रात अज्ञ जनतेच्या उद्धाराची व अध:पतितांना मोक्षमार्गावर नेण्याची तीव्रतर इच्छा तथा नास्तिकांना ईश्वराभिमुख करण्याची प्रतीत होते.

या पुस्तिकेतील प्रस्तावनेत गोपाळ हरि पुराणिक उपारव्य - काका पुराणिक यांनी वरील माहिती दिली आहे. स्तोत्राचे शब्दश: भाषांतर न देता केवळ त्यातील उपदेशांचा परिचय करून दिला आहे.

•• •• ••

**चर्पटपंजरिका स्तोत्रातील काही भाग पाहू :**

।।चर्पटपंजरिका स्तोत्रम्।।

भजगोविंदं भज गोविंदं भज गोविंदं मूढमते ।

प्राप्ते संनिहिते मरणे नहि नहि रक्षति डुकृत्र् करणे ।।धृ.।।

अरे वेड्या ! गोविंदाचे नामस्मरण कर, गोविंदाचे भजन कर. गोविंदाचेच सेवन कर, अंत्यकाळ समिप येऊन ठेपल्यावर आतां 'डुकृत्र करणे' हा व्याकरणातील धातुपाठ घोकून काय उपयोग? त्यामुळे तुझे रक्षण कसे होणार, तरी तू आता गोविंदाचा आश्रय घे त्याला शरण जा. (भज गोविंद - हे धृवपद प्रत्येक श्लोकानंतर म्हणणे)

दिनमपि रजनी सायं प्रात: शिशिरवसंतौ पुनरायात: ।

कालक्रीडती गच्छ त्यायुस्तदपि न मुम्चुत्याशावायू।।१।। भज गोविंद

दिवस आणि रात्र, संध्याकाळ आणि प्रात: काळ, शिशिरऋतू व वसंत ऋतू एका मागून एक येत असतात. अशा प्रकारे काळाची लीला नित्य चालू असते. कालचक्र अविरत फिरत असते व त्यात आयुष्य संपून जाते. हे सर्व कळत असूनही माणसाला आशारूपी भ्रम, आशेचा झंझावाती वारा, आशारूपी पिशाची, ही काही देहाला सोडत नाही. देहाबद्दल किंवा जगातील वस्तुमात्राबद्दल अभिलाषा कमी होत नाही. तो आशेच्या बंधनात सतत गुरफटून असतो. अल्पमते ! हे जाणून आतातरी तू गोविंदाला भज. काळ समीप आलाय आता तरी या मोहनिद्रेतून जागा हो.

अग्रे वन्हि पृष्ठे भानू रात्रौ चिबुकसमर्पित जानु : ।

करतल भिक्षा तरूतलवासस्तदपि न मुम्चत्याशापाश:।।२।।

हटयोगी दिवसा समोर अग्नी पेटवून त्याच्या शेकाने व मागील बाजूस सूर्याच्या प्रखर उन्हात शरीर तापवतो. रात्री नीट झोपून शरीर न सुखविता गुडघ्यावर हनुवटी ठेवून रात्र काढतो. पात्राचा उपयोग न करता तळहातावरच भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करतो, झाडाखाली राहतो. अशी खडतर तपश्चर्या करून सुद्धा तो आशेचे पाश तोडू शकत नाही. त्याच्या मनात वैराग्य निर्माण होत नाही. मग तुझी काय कथा ! म्हणून तुला त्रिवार सांगतो की तू गोविंद गोविंद म्हण, मरणकाल सन्निध आल्यावर दुसरे काही उपयोगाला येणार नाही.

यावद्वित्तोपार्जनसक्त स्त्राव नाभिजपरिवारो रक्त : ।

पश्चातद्धावति जर्जर देहे वार्तां पृच्छति कोपिन गेहे ।।३।।

जोपर्यंत मनुष्य पैसा मिळवीत असतो तोपर्यंतच त्याचे कुटुंबीय आप्तस्वकीय त्याला विचारतात, प्रेम करतात. परंतु म्हातारपणाने व्याधींनी जेव्हा देह जर्जर होतो, थकून जातो,

निकामी होतो तेव्हा मात्र घरचे त्याची साधी विचारपूसही करीत नाहीत. सर्व त्याची अवहेलना करतात. म्हणून वेड्या! तू गोविंदाची सेवा कर, नामस्मरण कर. त्यानेच तुझा उद्धार होईल. 'डुकृत्र् करणे' तुझे रक्षण करणार नाही. हे लक्षात घे.

अगंगलितं पतितं मुण्डं, दशनविहिनं जातं तुण्डम् ।

वृद्धो याति गृहीत्वा दण्डं, तदपि न मुग्चत्याशापिण्डम्॥६॥

शरीर गलितगात्र झालं, केस पिकले, दात गेले, गात्र थकली. हातात काठी धरल्याशिवाय शरीर सावरता येत नाहिये; तरी अशाही परिस्थितीत आशेचे पाश त्याला सोडीत नाहीत. तरी हे सर्व आशापाश दूर करून आतातरी गोविंद नामाचा ध्यास घे.

पुनरपिजननं पुनरपि मरणं, पुनरपि जननी जठरे शयनम्।

इह संस्तरे खलु दुस्तारे, कृपयापारे पाही मुरारे ॥ ८॥

पुन: पुन: जन्ममृत्यूच्या फेऱ्यात आडकून राहतो. पुन्हा जन्म घेताना मातेच्या पोटात जन्मापावेतो गर्भावास सहन करावा लागतो. अशा तरुन जाण्यास दुस्तर अशा भवसागरातून हे मुरारे मला पैलतीराला ने, माझे रक्षण कर. अशी आर्ततेने भगवंताची प्रार्थना कर. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटण्यास हाच केवळ एक मार्ग आहे.

पुनरपि रजनी पुनरपि दिवस: पुनरपि पक्ष: पुनरपिमास:।

पुनरप्ययनं पुनरपि वर्षं तदपि न मुग्चत्याशामर्षम् ॥ ९॥

रात्री मागून दिवस येता असे शुक्ल पक्ष उलटून कृष्ण पक्ष येतो. उत्तरायणाचा काल संपून दक्षिणायन सुरू होते. वर्षा मागून वर्षे जातात. मानवाचे आयुष्य कमी कमी होत जाते. तरी पण मनुष्य आशा, इर्षा कामक्रोधादि विकारातून मुक्त होत नाही. मूढ मानवा आता तरी जागा हो व त्या माधवाचे भजन कर नि स्वत:चा आत्मोधार करुन घे.

'चर्पटपंजरिकेतील' या काही श्लोकाचे उदाहरणा दाखल दिल्यानंतर 'द्वादशपंजरिकेतील' काही उदाहरणे देते.

द्वादशपंजरिकेतील प्रत्येक श्लोकाच्या शेवटी काही ठिकाणी 'भजगोविंद भजगोविंद' हे पालुपद (धृवपद) लावलेले आढळते. तर काहींच्या मते हे पालुपद या स्तोत्रात लावलेले नाही. तरी प्रत्येकाने आपल्या श्रद्धेनुसार ठरवावे, असे प्रस्तुत लेखकाने म्हटले आहे.

का ते कान्ता कस्ते पुत्र: संसारो ज्यमतीव विचित्र: ।

कस्य त्वं क: कुत आयातस्मत्वं चिंतययदिदं भ्रात:॥३॥

हे बंधो ! तुझी बायको कोण? तुझा मुलगा कोण? ईश्वरेच्छेने कोणती तरी स्त्री तुझी पत्नी झाली. तिच्या पोटी मूल जन्माला आले. याप्रमाणे हा सारा भ्रमाचा पसारा आहे. हा संसार विचित्र अजब आहे. तू खरोखर कोण आहेस? कोणाचा आहेस? कोठून आला आहेस? या गोष्टींतील रहस्यांचा विचार कर. म्हणजे तुझा भ्रमनिरास होईल.

कामं क्रोधं लोभं मोहं, त्यक्तात्मानं भावय कोऽहम् ।

आत्मज्ञानाविहिना मूढास्ते पच्यन्ते नरकनिगूढा: ॥ ५॥

काम, क्रोध, मोह, लोभ आदि सर्वविनाशी षड्रिपुंचा त्याग कर, त्यांना दूर सार आणि आत्मस्वरुपाचा म्हणजे खरोखर मी कोण आहे? याचा विचार कर. जे आत्मस्वरूपाच्या ज्ञानापासून वंचित राहतात, ते प्राप्त करून घेत नाहीत, असे मूर्ख लोक अनंत काल पावेतो नरकामध्ये खितपत पडतात. अनेक यातना भोगतात.

शत्रौ मित्रे पुत्रे बन्धौ, मा कुरुथत्न विग्रहसन्धौ।

भव शमचित्त: सर्वत्रत्वं, वाच्छस्याचिराधदि विष्णुत्वम्॥ ७॥

शत्रु - मित्र, पुत्र - भाऊबंद यांच्याशी भांडणतंटा करू नकोस. त्यांच्यामधे भांडण लावायलाही जाऊ नकोस

नि भांडण असेलच तर ते मिटवायला जाऊ नकोस. तुला जर लौकरात लौकर श्रेष्ठतम सच्चिदानंद स्वरुपाचा आनंद अनुभवायचा असेल तर चित्तामधे सर्वत्र समभाव ठेव. उच्च - नीच, आपला - परका, श्रीमंत - दरिद्री हा भेदभाव असा द्वैतभाव सोडून दे.

नलीनीदलगतसलिलं तरलं, तद्वज्जीवीतमतिशयचपल्

विद्धी व्याध्यभिमानग्रस्तं, लोकं शोकहतच समस्तम्॥१०॥

कमळाच्या पानावर पाण्याचा थेंब पडला असता तो जसा चंचल, अस्थिर असतो, क्षणमात्रात ओघळून पडतो त्याचप्रमाणे आपले जीवनही अतिशय अस्थिर आहे चंचल आहे, हे सर्व नित्यव्यवहारात दिसत असूनही सर्व लोक अभिमानरूपी दुर्धर रोगाने पछाडले आहेत व त्यामुळे दुःखी आहेत. शोकाने व्याकूळ झाले आहेत. ही गोष्ट लक्षात घेऊन वृथा अभिमानाचा पूर्णतः त्याग कर.

द्वादशपंजरिकामय् एषः शिल्याणां कथितो उपदेशः ।

येषां चित्ते विवेकस्ते, पच्यन्ते नरकमनेकम् ॥ १३॥

वरील प्रमाणे बारा स्वादिष्ट खाद्यांच्या खिरापतीप्रमाणे शिष्यगणास बारा श्लोकांतून भवसागर पार करून मुक्ती साध्य करण्याकरता मधुर असा उपदेश केला आहे. त्याच्या पठनाने, चिंतनाने ज्यांचा विवेक जागृत होणार नाही ते चिरकाल अनेक प्रकारच्या नरक यातना भोगत, दुःखभोग भोगत राहतील.

•• •• ••

अतिशय नादमधुर मुक्तिपर अशी दोन स्तोत्रे आपल्या पुढे ठेवली आहेत. आपण स्वतः म्हणून लहान मुलांना पण म्हणायला शिकवावीत. सोपी शब्दरचना व नादमाधुर्यामुळे ती म्हणायला लहान मुलांना पण आवडतील. त्यामुळे लहानपणीच मुलांची जीभ वळेल, स्पष्ट शब्दोच्चार करता येतील.

आमच्या लहानपणीच आमच्या आईने ही स्तोत्रे स्वतः मोठ्याने म्हटली म्हणून ती आमच्या कानावर पडली. आजही त्यातील बरेचसे श्लोक पाठ आहेत. गंमत म्हणजे त्यातील ज्या श्लोकात 'स्तदपि न मुञ्चत्याशावायुः । किंवा 'स्तदपि न मुञ्चत्याशापाथः ॥ असे आशावायु : व आशापाशः असे शब्द असल्यामुळे माझे नाव त्याच्यात आहे असे वाटून लहानपणी त्याची गंमत वाटली. ते पुन्हा पुन्हा म्हटले गेले व त्यामुळे ते लक्षात राहिले. म्हणायला हे श्लोक कठीण आहेत पण एकदा म्हणता आले की तुम्हीही ते उच्चार लक्षपूर्वक करा व पाठ करा. एकत्र म्हणतांना मुलांना मजा वाटेल व चांगले संस्कारही होतील.

या पुस्तिकेवर प्रकाशकाचे नाव, मूल्य वगैरे काहीच छापलेले नाही. फक्त ज्याने हे उपलब्ध करून दिलेय त्या लेखकाचे (श्लोक शंकराचार्यांचे व अर्थ या लेखकाने लिहिले आहेत.) नाव लेखकाचे प्रास्ताविका खाली. गोपाळ हरि पुराणिक उपारव्य काका पुराणिक असे दिले आहे. बाकी किती साली ही पुस्तिका छापलीय त्याचा उल्लेख नाही. माझ्या जवळची पुस्तिका नवी कोरी आहे जीर्ण जुनी नाही म्हणजे अलिकडील प्रत आहे. आईच्या कपाटात हा खजिनाच हाती लागला तो मी सर्वांपुढे ठेवलाय कोणीही तो लुटावा.

एका दुकानात या पुस्तिकेची मागणी केली तर मिळाली नाही. आणखी कुठे विचारुन पहा, मिळाली नाहीच तर माझ्या पुस्तिकेच्या झेरॉक्स काढून मी द्यायला तयार आहे. सर्वांनी याचा जरुर लाभ घ्यावा हीच इच्छा आहे.

**आशा भिडे**

बी /३ विजय अर्पाटमेंटस्

'आराधना' टॉकीज जवळ

ठाणे (प) ४०० ६०२

दूरध्वनी - २५४१०१४०

# देखण्या निसर्गाचा अविस्मरणीय आविष्कार अंदमान निकोबार बेटांचा समूह !

*अंदमान येथे अलीकडेच जाऊन आलेले पर्यावरण प्रेमी श्री. पुनम सिंगवी अंदमानच्या इतिहासाबरोबरच पर्यावरणाचा विचारही या लेखात मांडत आहेत - संपादक*

भारताच्या मुख्य भूमीपासून दक्षिण - पूर्वेला सुमारे २००० कि.मी. सामुद्री अंतरावर बंगालच्या उपसागरात हिंदी महासागराच्या अगदी तोंडाशीच सुमारे ६७२ लहानमोठ्या बेटांचा एक अतिसुंदर समूह आहे, जो भारतीय संघराज्याचाच भाग आहे. इतिहासाची थोडीफारही जाण असलेल्या सर्वसामान्य भारतीयास अंदमान परिचित आहे तो 'काळे पाणी' आणि ब्रिटिश क्रौर्याचे स्मारक म्हणूनच. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्रजांची सत्ता असताना महत्त्वाचे स्वातंत्र्यसेनानी आणि जन्मठेप व फाशीची शिक्षा ठोठावलेल्या अनेक कैद्यांना येथील सेल्युलर जेलमध्ये ठेवले जात असे. महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे अग्रणी स्वातंत्र्यवीर सावरकरांना दुहेरी जन्मठेपेची शिक्षा पुकारण्यात आल्यानंतर याच तुरुंगात ठेवण्यात आले होते. येथे असतानाच त्यांच्या बऱ्याच ज्वलंत साहित्य - काव्याची निर्मिती झाली होती. त्यामुळे सर्वसामान्य मराठी माणसाचे अंदमानशी एक अतिशय जवळचे भावनिक नाते आहे.

अलीकडेच अंदमान प्रामुख्याने प्रकाशात आले ते डिसेंबर २००४ मध्ये कोसळलेल्या त्सुनामी संकटामुळे. हिंदी महासागरातील ही बेटे व इंडोनेशिया, श्रीलंका आदी देशात त्यामुळे प्रचंड प्रमाणावर जीवित व आर्थिक वित्तहानी झाली होती. महासागराच्या तळाशी झालेल्या कांही भौगोलिक घडामोडींमुळे समुद्रावर प्रचंड वादळ निर्माण झाले. त्यांत मोठ्या प्रमाणावर लाटा उफाळल्या. समुद्राने जमिनीवर आक्रमण केले आणि क्षणार्धात 'होत्याचे नव्हते' आणि 'नव्हत्याचे होते' झाले. हा फटका इतका जबरदस्त होता की येथील सबंध रॉस बेटच गॅसच्या शेगडीवर ठेवलेल्या कढईप्रमाणे एका बाजूने पाण्याखाली दडी घेऊन दुसऱ्या बाजूने चक्क वर उचलेले गेले. आजही खालच्या दिशेने कलंडल्या गेलेल्या किनाऱ्यावरील पडझड झालेली घरे आणि ताडमाडाचे असंख्य जीवित वृक्ष एका बाजूने तिरके झालेले दिसून येतात. अनेक बेटांवर नव्याने खाचरे निर्माण झाली. समुद्र किनाऱ्यालगत अनेक वृक्ष मुळासकट उखडले जाऊन जागोजागी ईतस्तत: उन्मळून पडले. त्यामुळे अनेक पर्यावरणीय बदल झालेले दिसतात. असे बदल आणि त्याचे संबंध जैविक सृष्टीवर झालेले परिणाम लक्षात यायलाच मुळी अनेक वर्षांचा कालावधी निघून जाईल. बेटांवरील मानवी जीवन आता पुन्हा नित्य नियमित सुरू झाले आहे आणि ते तसे व्हायलाच हवे. नाही का ?

आज ही बेटे भारतीय संघराज्याचे भाग बनून आहेत याचे श्रेयदेखील निर्विवादपणे ब्रिटिशांनाच द्यायला हवे. त्याचे कारण असे की १७ व्या ते १९ व्या शतकात युरोपातील वेगवेगळ्या देशातील व्यापारी टोळ्या (होय, टोळ्याच !) समुद्र मार्गाने जगभर प्रवास करीत असताना तोंवर उजेडात न आलेल्या अनेक सामुद्री बेटांवर जाऊन तिथे आपले बस्तान बसवीत होत्या. तेथील मूळ आदिवासी आणि इतर लोकांशी कधी व्यापार, वाटाघाटी तर प्रसंगी लढाया करीत राहून तिथे आपली राजकीय सत्ता देखील वाढवीत होत्या. त्यात प्रामुख्याने डच, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रज लोकांचा समावेश होता. आपल्या आरमारी शक्तिमुळे या लोकांनी अमेरिका, आफ्रिका आणि

आशिया खंडातील अनेक बेटे आणि द्वीपकल्पांवर आपापल्या वसाहती आणि सत्तास्थाने निर्माण केली. त्यामुळेच त्यांना महासत्तांचे रुप प्राप्त झाले.

याचप्रमाणे आधी सुमारे १७६८ च्या सुमारास डच लोक अंदमान - निकोबारमध्ये पोहोचले. मात्र त्यांचे तिथे फार बस्तान बसायच्या आधीच ब्रिटिश - ईस्ट इंडिया कंपनीतील लोक तिथे पोहोचले. त्यांनी डच लोकांना तेथून हुसकावून लावीत त्या बेटांचा कब्जा घेतला. त्याच सुमारास त्यांनी भारतातही हातपाय पसरायला सुरुवात केली होती. त्यामुळे भारताच्या दक्षिण आणि पूर्व किनाऱ्यावरील केरळ, तामिळनाडू, आंध्र आणि बंगाल राज्यातून मजूर आणून येथील मूळ आदिवासी लोकांशी मुकाबला करीत एकेका बेटावर जम बसवायला सुरुवात केली. येथील सर्वच बेटांची नांवे त्यामुळे ब्रिटिश व्यापारी आणि राज्यकर्त्यांशी जोडली गेलेली दिसतात. उदा. रॉस, हॆवलाक, हॅवलेट, रॉथम, स्मिथ इ.

१९४२ ते १९४५ च्या दुसऱ्या महायुद्ध काळात जपानी लोकांनी ही बेटे इंग्रजांकडून हिसकावून घेत तेथे आपले राज्य केले. याच कालावधीत भारताचे स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस येथे येऊन स्वातंत्र्याची ज्योत चेतवून गेले. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाची अखेर झाल्यानंतर पुन्हा या बेटांचा ताबा ब्रिटिशांकडे आला. त्यानंतर १९४७ मध्ये भारताला इंग्रज सत्तेकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र ही बेटे देखील भारताच्या ताब्यात येउन आज आपल्या संघराज्याचा अविभाज्य भाग बनून राहिली आहेत.

बारमाही हिरवेकंच वृक्ष - वनस्पती आणि विलक्षण सुंदर सामुद्री जैविक संपत्तीने खचाखच भरलेल्या या निसर्गसंपन्न बेटांवरील वनसंपदेचे हरण इंग्रज लोक प्रचंड प्रमाणावर करीत होते. त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचंड म्हटले जाईल अशा एका सॉमिलची इथे उभारणी केली. तिचे नांव ''रॉथम सॉ मिल''. तोडलेले वृक्ष जंगलातून समुद्रकिनाऱ्यावरील बोटीपर्यंत आणण्यासाठी हत्तींचा उपयोग केला जाई. (आजही तो तसाच केला जातो.) तिथून पुढे समुद्र किनाऱ्यावरील सॉ मिल व नंतर मोठ्या मालवाहू बोटींनी इंग्लडला ही संपत्ती वर्षानुवर्षे वाहून नेली जात असे.

संपत्ती हरणासाठी आणि त्याच्याच बरोबरीने ब्रिटिशांनी या बेटांचा उपयोग केला, तो भारतातील स्वातंत्र्यसैनिक आणि इतर गुन्ह्यांसाठी जन्मठेप, फाशी आदी प्रकारची शिक्षा झालेल्या खतरनाक गुन्हेगारांना कैद करुन ठेवण्यासाठी. त्या कैद्यांकडून अनेक प्रकारची शारीरिक श्रमांची कामे त्यांना नाममात्र भोजनावळ फक्त देऊन केली जात असत. त्यांना अतिशय क्रूरतेने वागविले जात असे. त्यांच्या इथून पळून जायच्या वाटा बंद झालेल्या असत. तसेच बाहेरच्या जगाशी संबंध देखील नष्ट होत असे. या बेट समूहांची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेअर या प्रमुख बंदरावरील सेल्युलर जेलमध्ये या बंदिवानांना ठेवले जात असे. तळ मजला धरून तीन मजली असलेले हे कारागृह केंद्रस्थानी असलेल्या कार्यशाळेपासून सप्तकोनी बराकीत विभागले गेले होते. त्यांतील तीन बराकी आजही शाबूत असून कारागृहाच्या या वास्तूत स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक उभारले गेले आहे. एका दालनात इथे तुरुंगवास भोगलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांची छायाचित्रे त्यांच्या अल्प परिचयासकट लावण्यात आलेली आहेत. दुसऱ्या एका दालनात नेताजी सुभाषचंद्राच्या जीवनातील प्रमुख घटना आणि आठवणींचे चित्रण करण्यात आलेले आहे. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे वास्तव्य असलेली खोली आवारात शिरल्यानंतर उजव्या हाताकडील बराकीतील तिसऱ्या मजल्यावरील कोपऱ्यात आहे. याच खोलीच्या भिंतीवर कोळशाच्या सहाय्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या अजरामर झालेल्या काव्याची निर्मिती करून ठेवली होती. आज मात्र या भिंती रंगरंगोटी करून स्वच्छ

ठेवलेल्या दिसतात. कार्यशाळेत कारागृहातील बंदिवानांकडून करून घेतल्या जाणाऱ्या कामाचे तसेच ज्या अमानुष पद्धतीने त्यांना वागविले जात असे त्याची प्रतीके ठेवलेली आहेत. 'कोलू' नांवाने ओळखला जाणारा तेलाचा घाणा आहे. बाहेर दुसऱ्या एका कोपऱ्यात कैद्यांना फाशी दिले जात असे तो वधस्तंभ आहे; फासावर लटकविण्याच्या आधी त्यांनी करायच्या अंतिम धार्मिक विधीसाठीचे दालनही आहे. एकेका वेळी तीन, तीन कैद्यांना फासावर लटकविण्याचे फासही वधस्तंभावर लटकतांना दिसतात. आज या कारागृहाच्या आवारात रोज संध्याकाळी ४.३० वाजता इंग्रजी आणि ५.३० वाजता हिंदीतून सुमारे अर्ध्या तासांचे कार्यक्रम दृक्श्राव्य माध्यमातून दाखविले जातात. त्यांतून ब्रिटिश क्रौर्याचे मूर्तिमंत चित्रण आपल्यासमोर केले जाऊन स्वातंत्र्य सैनिकांनी केलेला स्वार्थत्याग आणि बलिदानाची आठवण दिली जाते.

मात्र, आज परिस्थिती बदललेली आहे. इथे येणाऱ्या पर्यटकांनी, विशेषत: तरुणांनी ब्रिटिश क्रौर्याच्या या इतिहासातून बाहेर पडीत या बेटसमूहांचे जैविक आणि भौगोलिक महत्त्व समजून घेऊन त्याचे जतन करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करायला हवे असे मला प्रकर्षाने वाटते. इतिहासातील बलिदान व स्वार्थत्यागातून योग्य तो बोध घेत उद्याचा भारत घडविण्यासाठी या बेटांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेणे महत्त्वाचे आहे.

भारताच्या मुख्य भूमीच्या तीन बाजूंना असलेल्या प्रचंड समुद्रालगत कुठेही आढळून न येणारी, प्रवाळयुक्त संपन्न जैविक सृष्टी या बेटसमूहालगतच्या जवळपास सर्वच बेटांलगत आढळून येते. किनाऱ्यालगतच्या उथळ समुद्रातील पाण्यात शिरून समुद्राच्या अंतरंगांचा वेध घेणे हा एक महाविलक्षण आनंद देणारा अनुभव असतो. त्यासाठी आपल्याला पाण्यात पोहोता यायलाच हवे असे नाही. 'डूंगी' नांवाने लहानशा होडग्यातून येथील कुशल नावाडी आपल्याला पाण्यात उतरवून ही अनोखी सफर अतिशय सुरक्षितपणे घडवून आणतात. आपण फक्त मनात कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता ते देत असलेला जुजबी 'स्नोर्केलिंग किट' चेहऱ्यावर चढवायचा. यात आपले नाक आणि डोळ्यांवर चढवायचा ॲक्रेलिक मुखवटा असतो. त्याचबरोबर तोंडात घालून ओठांनी धरून ठेवायची आडवी चकती आणि त्याला जोडलेली एक छोटीशी नळी असते. आपण पाण्याखाली शिरल्यानंतर हे नळकांडे पाण्याच्या पृष्ठभागापेक्षा थोडे वर राहाते. त्याचा उपयोग आपल्याला तोंडाद्वारे श्वास घेण्यासाठी होतो. आपण श्वासोच्छवास नाकाने न करता तोंडाने करायचा असतो. दोन - चार मिनिटे आपण ही क्रिया करायची सवय केली की सारे काही व्यवस्थित जमून येते. पोहोयला न येणाऱ्यांनी - किंबहुना साऱ्यांनीच पाण्यावर तरंगत राहायला मदत होण्यासाठी त्यांच्याकडूनच मिळणारी गोल व पोकळ रबरी ट्यूब वापरायला हरकत नसते. याबरोबर खरे तर संपूर्ण शरीर झाकणारा खास समुद्राखाली विहार करण्यासाठी वापरायचा सामुद्री पोषाख आणि सुरक्षित बूट देखील वापरायला मिळाले तर उत्तम. परंतु, किनाऱ्यालगतच राहून छोटीशी सफर करणाऱ्यांचे त्यावाचून काही अडत नाही. आपला हात धरुनच ते कुशल नाखवा आपल्याला पाण्याखालील ही सफर घडवितात. ते करीत असतांनाच पाण्याखालील रंगीबेरंगी प्रवाळयुक्त खडक, वनस्पती, इतर लहान - मोठे प्राणी, मासे आदिंची नांवे सांगत परिचय करून देतात. आपण फक्त त्यांचा हात धरून (किंबहुना तेच आपल्या हाताला धरुन दिशा देत असतात!) बिनधास्त विहार करीत राहायचे. शक्य असेल त्या सर्वच लहानथोरांनी अंदमानात गेल्यावर हा विलक्षण अनुभव घ्यायलाच हवा. एरवी दूरदर्शनवर दिसणारी ''नॅशनल जिऑग्राफिक चॅनल'' वरील सामुद्री सृष्टी इथे जिवंत होते आणि आपण असतो त्यातील नायक !

अद्‌भुत सामुद्री सृष्टिबरोबरच इथे अनुभवायला मिळते ते विषुववृत्तीय प्रदेशातील बारमाही वनसंपदेचे विपुल भांडार ! अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती, मसाल्याच्या पदार्थांचा झाडोरा, ताड - माड - सुपारी आणि इतर असंख्य वृक्षांनी येथील वने समृद्ध आहेत. विविध प्रकारची फुलपाखरे, कीटक आणि अन्य वन्य प्राणी या जंगलांमधून संचार करीत असतात. या जंगलांमध्ये मूळ वस्ती असलेले जावरा जमातींचे मोजकेच लोक शिल्लक राहिलेले असून या बेटांच्या मध्य - पश्चिम ते उत्तर किनाऱ्यालगतची वने त्यांच्या साठी सुरक्षित ठेवली गेली आहेत. त्या बेटांवर जायला प्रवाशांना परवानगी नसते.

या बेटांचे हिंदी महासागरावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने तर खूपच महत्त्व आहे. त्यामुळेच भारताच्या सुरक्षेच्या दृष्टिने भारत सरकारने आपली आरमारी ताकद इथे केंद्रित केलेली आहे.

या बेटांचा विकास करताना त्यांचे हे वैशिष्टपूर्ण स्थान आणि समृद्ध वनसंपदा व सामुद्री रत्नभांडाराचे संशोधन आणि रक्षण करण्याचेच लक्ष्य समोर ठेवायला हवे. उगाच पर्यावरणास घातक ठरेल असे कुठलेही उद्योगधंदे सुरू करण्यापेक्षा पर्यावरणीय निरीक्षण, संशोधन, संरक्षण आणि सुधारणा करण्यासाठी शिक्षण देणाऱ्या जागतिक दर्जाच्या संस्था आणि विद्यापीठाची निर्मिती करण्यावर भर द्यायला हवा. हवामान व अवकाश निरीक्षणाच्या दृष्टीने देखील या संस्था विकसित व्हायला हव्या. पर्यटन उद्योगास देखील खूप चालना देता येण्यासारखे आहे. मात्र अशा पर्यटन विकासास विशिष्ट दिशा जाणीवपूर्वक व कटाक्षाने देणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचतारंकित आणि डिस्को संस्कृती फोफावू न देता निसर्गाशी संवाद साधण्यासाठी येणारे निसर्गप्रेमी व विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे आवश्यक आहे. भारत सरकार या दृष्टिने प्रयत्न करीत असले तरी हे काम अधिक जोमाने, वेगाने आणि जाणीवपूर्वक होणे आवश्यक आहे असे आग्रहपूर्वक म्हणावेसे वाटते.

आजचे चित्र मात्र फारसे आशादायक नाही. इथे येणारे प्रवासी अधिकांश भारतीय, बांगलादेशी आदी असल्यामुळे ''जाऊ तिथे कचरा टाकू'' या आपल्या ब्रीदाचे ते अत्यंत कटाक्षाने पालन करताना दिसून येतात ! येथील 'वायपर आयलँड' म्हणजे प्लॅस्टिकच्या कचऱ्याचा प्रचंड उकिरडा झालेला आहे ! आम्ही गेलो त्याच आठवड्याच्या सुरुवातीस भारताच्या राष्ट्राध्यक्षा श्रीमती. प्रतिभाताई पाटील येऊन गेल्यामुळे त्या जिथे,जिथे जायच्या होत्या ती बेटे मात्र चकाचक केलेली दिसत होती! एवढे चकाचक की त्या चकाकीतून अनेक वृक्षांनादेखील सफाचट करण्यात आल्याचे कळले !

महात्मा गांधी नॅशनल पार्क असलेल्या सुंदर वंडूर नामक बेटावर ताई जायच्या होत्या. तिथे जायला पोर्ट ब्लेअरवरुन उत्तम डांबरी रस्ता (मोटारीने अर्धा तास फक्त प्रवास असलेला) आहे. तरीदेखील तेथील किनाऱ्यावर त्यांच्यासाठी छोटेसे हेलिपॅड तयार करण्यात आले होते. त्या समुद्र किनाऱ्यावर एकीकडे त्सुनामीमुळे मूळासकट उन्मळून पडलेले वृक्ष दिसत होते. त्याच्याच जोडीला हे हेलिपॅड तयार करण्यासाठी तोडल्या गेलेल्या सुमारे शंभर एक ताड-माड आदि वृक्षांचे बुंधेदेखील प्रकर्षाने लक्ष वेधून घेत होते.

हे होऊ नये असे आम्हाला कितीही मनापासून वाटत असले तरी अजून काही वर्षे तरी आपल्या देशात हे असेच होत राहाणार आहे हे देखील तेवढेच स्वच्छ दिसते आहे.

म्हणूनच म्हणतो, अंदमानमधील बेटांची दादर, गिरगांव, जुहू चौपाटी आणि तेथील वनांचे गृहसंकुलात रुपांतर व्हायच्या आधीच ते टाळण्याच्या प्रयत्नांना सुरुवात करा. शक्य असेल त्यांनी आपण स्वत: एकदा तिथे भेट देऊन त्या निसर्गाचा आनंद अनुभवावा. आपल्या मुलाबाळांना तिकडे सहलीवर पाठवून त्यांना त्याचा

अभ्यास - निरीक्षण - रक्षण - संवर्धन करण्याची संधी द्यावी आणि उत्तेजित करावे. त्यातूनच होणार आहे त्यांचेही रक्षण आणि विकास !

आज मात्र तिथे जाणे खूपच खर्चाचे आहे. (हाँगकाँग - बँकाक - सिंगापूर आदि ठिकाणी जाऊन येणे त्यापेक्षा थोडे स्वस्तच आहे !) तिथे जाण्यासाठी आज चेन्नईहून विमानाने सुमारे अडीच तास आणि बोटीने दोन दिवस लागतात. कलकत्त्याहून देखील विमानाने जाता येते. ही बेटे भारताचाच अविभाज्य अंग असल्याने भारतीय नागरिकांना तिथे जायला पासपोर्ट, व्हिसा आदींची आवश्यकता नसते. राहायला खिशाच्या आकारमानाप्रमाणे सोय होते. इतर सगळी व्यवस्था उत्तमपैकी होऊ शकते. दक्षिण ते उत्तर भारताच्या चवीचे भोजन व इतर खाद्यपदार्थ उपलब्ध होऊ शकतात.

बाजारात कन्याकुमारीप्रमाणेच शंख - शिंपले, नारळाच्या कवट्या आदिंपासून तयार केलेल्या विविध वस्तूंनी खचाखच भरलेली दुकाने असतात.

अंदमान बेटातील सेल्युलर कारागृहाप्रमाणेच समुद्रिका, सागरिका, अॅन्थ्रॉपॉलजिकल म्युझियम यांना भेट द्यायलाच हवी.

**श्री. पुनम सिंगवी**

५/७०२, फ्लॉवर व्हॅली,
इस्टर्न एक्सप्रेस हायवे,
ठाणे - ४०० ६०१
मोबाईल : ९३२३२९१८९०
ईमेल : punamsingavi@mtnl.net.in

●●●

**स्वकीय**

हा शब्द संस्कृत विशेषण आहे. याचा अर्थ आहे स्वत:चा. या शब्दात 'स' ला व जोडून, 'क' ला दुसरी वेलांटी हवी. या शब्दाचे सामान्यरूप करतानाही या मूळ शब्दात फरक पडत नाही. उदा. स्वकीयांचे, स्वकीयांना इ.

**बीज**

हा संस्कृत शब्द आहे. मूळ, संतती, द्वितीया इ. या शब्दात 'ब' ला दुसरी वेलांटी द्यावी. या शब्दाचे सामान्यरूप करतानाही या शब्दात बदल करू नये. 'बिजेला' 'बिजेसाठी' असे रूप करू नये.

**नि:संग**

हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ आहे विरक्त, लोकरीती सोडलेली. या शब्दात 'न' पुढे विसर्ग हवा. काही वेळा 'नित्संग' असा चुकीचा शब्द लिहिला जातो. तो चुकीचा आहे.

**सहस्त्ररश्मी**

'सहस्त्ररश्मी' म्हणजे सूर्य. 'रश्मी' म्हणजे प्रकाश, किरण. सूर्याला स्हस्त्र किरणं असतात म्हणून त्याला सहस्त्ररश्मी म्हणतात. या शब्दात 'स' ला 'र' जोडावा व 'श' ला 'म' जोडावा. 'स' ला 'त्र' जोडण्याची चूक होऊ शकते.

**बुभुक्षित**

याचा अर्थ आहे भुकेला, हपापलेला, गरजू इ. हे संस्कृत विशेषण आहे. हा शब्द लिहिताना 'ब', 'भ' ला पहिला उकार व 'क्ष' ला पहिली वेलांटी द्यावी. शब्दाचा उच्चार जर योग्य रीतीने केला, तर ऱ्हस्व, दीर्घ चुकणार नाही.

# ठाण्याची ब्राह्मण सभा

*ठाण्यातील ब्राह्मण सभा हे ठाण्याच्या संस्था जीवनातील महत्त्वाचे नाव. या संस्थेने २६ जानेवारीला ८१ वर्षे पूर्ण केली. त्या निमित्ताने दिशाचे जुने हितचिंतक व सभासद श्री. सुरेंद्र लागू यांचा हा लेख, दैनिक सन्मित्रच्या सहकार्याने येथे देत आहोत - संपादक*

ब्राह्मण सभेने ऐक्याऐंशी वर्षे पूर्ण करून ब्याऐंशीव्या वर्षात पदार्पण केले आहे. एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीपणे पार केला असून संस्थेची शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरू आहे. ऐक्याऐंशी वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत अनेक कार्यकर्त्यांचे योगदान संस्थेला लागले. त्यांचे अथक परिश्रम, निरलस सेवावृत्ती आणि तळमळ म्हणूनच जनमानसात ब्राह्मण सभेने स्वत:चे नाव, अस्तित्व आणि वेगळेपण सिद्ध केले आहे. अधिकाधिक समाजोपयोगी, लोकाभिमुख आणि काळाची पावलं ओळखून बदल करण्याच्या दृष्टीने संस्था सतत प्रगतशील आहे.

**प्रास्ताविक :**

ठाणे शहर पूर्वी ''तलावांच शहर'' म्हणून ओळखलं जात असे. तसेच एका वेगळ्या कारणासाठीदेखील ठाण्याची ओळख होती. ठाण्याला जसा गौरवशाली इतिहास आहे. तसेच भौगोलिक दृष्ट्या ठाणं मोक्याच्या ठिकाणी वसलं आहे. कालांतराने एक ''औद्योगिक शहर'' म्हणूनही ठाण्याचा नावलौकिक होता. तसं पाहिलं तर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा या आणि अशासारख्या सर्वच क्षेत्रात ठाणे शहराने स्वत:ची ओळख आणि वेगळेपण, अस्तित्व सिद्ध केले आहे, जपले आहे. परंतु या सर्वापेक्षा ठाणे शहराची खरी ओळख म्हणजे ठाणे हे ''सामाजिक संस्थाचे मोहोळ'' आहे. अनेक सामाजिक संस्थानी ठाण्याचं ''सांस्कृतिकपण'' जपलं आहे, त्याला सामाजिक दृष्ट्या समृद्ध आणि सक्षम केले आहे. सांगावयास मनस्वी आनंद आणि समाधान होत आहे की ''ब्राह्मण सभा, ठाणे'' ही त्या मोहोळांतील एक सामाजिक संस्था आहे.

सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या समाजधुरीणांनी २९ जानेवारी १९२६ रोजी संस्था स्थापनेची घोषणा केली. त्याकाळी ब्राह्मण समाजाला एकत्र आणणारी अशी प्रातिनिधिक संस्था ठाण्यात नव्हती. ज्ञातीसमाजात प्रेम, बंधुभाव व ऐक्य वाढवून परस्परांस सहाय्य करण्याच्या जाणिवेने सामाजिक, बौद्धिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात समाजाची प्रगती व्हावी, प्रबोधन व्हावे तसेच इतर सार्वजनिक उपक्रमांत अन्य संस्थांशी सहकार्य करावे अशा विविध उद्देशांनी संस्थेची स्थापना करण्यात आली. बदलत्या काळानुसार संस्थेने वाटचाल करणं किंवा स्वत:त बदल करणं जरुरीचे आहे. आजच्या गतिमान आणि बदलत्या कालप्रवाहात व स्पर्धेच्या युगात जर टिकायचं असेल तर नवनवीन गोष्टी अंगिकारणं आवश्यक किंवा अपरिहार्य आहे.

पुरोगामी किंवा काही चिकित्सक विचारसरणीची माणसं म्हणतील ह्यात कसलं आले आहे सामाजिक कार्य? समाजप्रबोधन ? हे तर केवळ ज्ञातिबांधवासाठीच मर्यादित आहे. अशा व्यक्तींना एवढंच सांगावस वाटतं की ब्राह्मण सभा, ठाणे सारख्या अन्य ज्ञातींच्याही सामाजिक संस्था आहेत आणि त्याही आपापल्या परीने यथाशक्ती, यथाशक्य समाजसेवा आणि सामाजिक कार्य करीत आहेत. भले ते मर्यादित स्वरूपाचं असेल. शेवटी समाज म्हणजे तरी काय ? संस्था, संघटना म्हणजे काय ? तर समविचारी, समआचारी व्यक्ती एकत्र येऊन कुटुंब बनत, अशी अनेक कुटुंब एकत्र येऊन संस्था बनतात आणि अशा

अनेक संस्था एकत्रित आल्यावर त्याचा समाज बनतो. समाज म्हणजे विविध क्षेत्रांतील, ज्ञातींतील, कार्यरत संस्था, संघटना, पक्ष म्हणजेच समाज अशी साधी व सोपी व्याख्या समाजाची करता येईल.

**सुरुवात :**

अशा संस्थेची वाटचाल कशी झाली, तिचे उपक्रम कोणते, तिचं कार्य कशा रितीनं चालतं याचा थोडक्यात आढावा घेतल्यास ते अधिक योग्य होईल. टेंभीनाक्याजवळील श्री. व्यंकटराव फाटक हॉल मध्ये बोलविण्यात आलेल्या सभेत ज्ञातींतील सुमारे २५० - ३०० व्यक्ति उपस्थित होत्या. थोर तत्वचिंतक आणि नामंकित व प्रतिष्ठित वकील कै. रा. स. भागवत यांचे अधिपत्याखाली एक योजना तयार करण्यात आली आणि सदरहू सभेत पौष वद्य ११ शके १८४८ शनिवार दि. २९ जानेवारी १९२६ रोजी ''ब्राह्मण सभा, ठाणे'' स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. मराठी शाळा नं. एक जवळच्या एका घरातील जागा भाड्याने घेऊन त्याठिकाणी संस्थेचं कार्यालय सुरु झालं. त्यावेळचे पहिले कार्यकारी मंडळ पुढील प्रमाणे -

अध्यक्ष - सर्वश्री दामोदर परशुराम वैद्य,

उपाध्यक्ष - स. के. भागवत, ह. शं. जोशी, का. र. रोडे,

कार्याध्यक्ष - प. अ. भट,

चिटणीस - रा. शं. देशपांडे, शं. गो. घैसास, ल. र. मुळे, मो. शि. प्रभुदेसाई

खजिनदार - नि. पु. आधारकर

सभासद - वे. शा. सं. बालकंभटजी वझे, सि. म. अभ्यंकर, वे. शां. सं. कृष्णभटजी खरे, द. प्र. रहाळकर, दु. गं. गांगल, चि. पां बर्वे, द. म. दामले, रा. प. पिटकर, वि. ल. जोशी, ल. र. पुरोहित, न. वि. तेरेदेसाई, रामभाऊ गाडगीळ, ग. के. साने, वा. वि. कुलकर्णी. ना.गो. अत्रे.

हिशेब तपासनीस - स. ह. परांजपे, वि. रा. कापरेकर.

संस्थेच्या वाढत्या कार्यासाठी स्वत:ची वास्तू असल्याशिवाय लोकोपयोगी कामे करता येणार नाहीत या जाणिवेपोटी १९२८ साली स्टेशन रोडवरील विठोबाच्या देवळासमोरील एका लहान बैठ घर खरेदी करण्यात आलं. खरं तर वास्तू विकत घेण्याएवढा निधी त्यावेळी संस्थेकडे नव्हता तथापि एक तळमळीचे व निष्ठावान कार्यकर्ते श्री. काकासाहेब वैद्य यांनी सर्वांचे सहकार्याने व सहभागाने कर्ज उभारणीची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. कालांतराने संस्थेचा वाढता पसारा, वाढता व्याप लक्षात घेता बैठ्या घराचा बराच कायापालट करून आवश्यक त्या दुरुस्त्या, सोयी व सुधारणा करून एक मजली सुंदर वास्तू तयार करण्यात आली. बांधकामाच्या एकूण खर्चापैकी जवळ - जवळ निम्मी रक्कम पुण्यातील दानशूर व्यक्ती श्री. कृष्णाजी बळवंत जोशी यांनी सभागृहासाठी देणगी म्हणून दिली. त्यांचे स्मरणार्थ सभागृहाचे ''राधाकृष्ण सभागृह'' असं नामकरण करण्यात आले. खर्चाची अन्य रक्कम समाजातील उदार देणगीदारांकडून जमा करण्यात आली. ब्राह्मण सभेचा वाढता पसारा, नवनवीन उपक्रम आणि काळाच्या गरजेनुसार वेळोवेळी इमारतीच्या वास्तूमध्ये बदल, सुधारणा आल्या आणि सध्या आपण जी इमारत बघत आहोत हे त्याचे मूर्तस्वरूप आहे.

**आजची ब्राह्मण सभा :**

आजमितीस ब्राह्मण सभेच्या सभासदांची संख्या बावीसशेचेवर झाली असून नवनवीन व्यक्ती संस्थेच्या सभासद होऊ इच्छित आहेत आणि ही सभा करीत असलेल्या कार्याची पावतीच आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात संस्थेच्या अनेक सभासदांनी नावलौकिक मिळविला असून संस्थेचे पर्यायाने ठाणे शहराचे नाव त्यांनी सन्मानित केले आहे. ब्राह्मण सभेला त्यांचा निश्चितच अभिमान आहे.

प्रतिवर्षी ब्राह्मण सभेतर्फे अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात कार्यक्रमांचे आयोजन केले जाते आणि सांगावयास आनंद वाटतो की, बहुतांशी उपक्रमांना रसिक श्रोत्यांचा, प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद असतो.

मकर संक्रांत व चैत्र मासांतील हळदीकुंकू, मंगळागौर पूजन, महालक्ष्मीपूजन अशा हिंदू सणांच्या निमित्ताने आपला समाज एकत्र यावा, स्त्री जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या या सणांच्या सामुदायिक सादरीकरणामुळे परस्पर परिचय, ऐक्यभाव व सहकार्याची भावना वाढीस लागते. या जाणिवेपोटी हे विशेष अगत्याने, थाटात परंतु समारंभ पावित्र्य व शुचितेला बाधा न येता संपन्न होत असतात.

आपल्या सदस्यांच्या कुटुंबियांनी एकत्र यावे व ब्राह्मण एक्याला व्यापक परिमाण लाभावे यादृष्टीने वार्षिक स्नेहसंमेलन, कौटुंबिक सहल, पाल्यांसाठी विविधस्पर्धा, करमणुकीचे कार्यक्रम, गुणी विद्यार्थ्यांचा गौरव असे कार्यक्रम आयोजित केले जातात. उद्देश एवढाच की उगवत्या कलाकारांना प्रारंभीचं व्यासपीठ मिळावं.

श्रीदासनवमी, परशुराम जयंती, सावरकर जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी अशा युगपुरुषांचे दिन साजरे करताना केवळ विभूती पूजा हा उद्देश संस्थेने कधीही डोळ्यासमोर ठेवला नाही. या महान पुरुषांच्या जीवन प्रवासाचा व महान कार्याचा परिचय करुन देण्यासाठी अत्यंत अभ्यासू, जाणकार व उत्तम वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर या थोर व्यक्तींच्या जीवनाचा व गुणांचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने वक्तृत्व व पाठांतर स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच या दिनांचे औचित्य साधून वयाची साठ व पंच्च्याहत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत अशा सन्माननीय सभासदांचा आदरपूर्वक सत्कार केला जातो.

**इतर कार्यक्रम :**

संस्था समाजाभिमुख आणि कार्यसीमा विस्तारित होण्याचे उद्दिष्टाने कोजागिरी मैफल, वधू - वर पालक मेळावा, रक्तदान शिबीर, सुगमगीत गायन स्पर्धा, पाठांतर स्पर्धा या आणि अशा सारखे समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातात. मात्र सरकारी धोरणांमुळे आणि अल्प प्रतिसादामुळे दिवाळी फराळ योजना, जलतरण प्रशिक्षण शिबीर इत्यादी उपक्रम नाईलाजाने बंद करावे लागले.

२६ जानेवारी, १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणांचे महत्त्व लक्षात घेऊन ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. समाजशांती, समृद्धी व सुखासाठी संस्थेच्या वास्तूत पवित्र व मंगल कार्य व्हावे, आध्यात्मिक वातावरण निर्माण व्हावे आणि त्यानिमित्ताने ज्ञाती बांधवानी एकत्र यावे या भावनेतून महिला व पुरुष यांचे संयुक्त विद्यमाने एकवीस हजार आवर्तने आयोजित केली जातात. संस्थेचे दिवंगत सभासद, हितचिंतक यांचे पुण्यस्मरण करण्याच्या भावनेने पितृपक्षामध्ये लघुरुद्राभिषेक करण्यात येतो.

ब्राह्मण सभा, ठाणे प्रामुख्याने ज्ञाती बांधवांसाठी कार्यकरणारी सामाजिक संस्था असली तरी तिच्या घटनेत नमूद केल्याप्रमाणे अन्य समाजवर्गासाठी, मंगलकार्य,

*नशिबाने कामे झाली असती, तर कामे उतलीच नसती.*

समारंभ, सभा इत्यादिसाठी सभागृह भाड्याने देण्यात येते. किंबहुना आजच्या परिस्थितीत इतक्या वाजवी दरात आणि अधिकाधिक सेवा व सोयी पुरवणारी संस्था म्हणून तिचा उल्लेख केल्यास अतिशयोक्ती होणार नाही. वरील सर्व उपक्रमांव्यतिरिक्त एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेंतून ठाण्यातील विविध क्षेत्रात कार्य करण्याऱ्या सामाजिक संस्थाना जागेअभावी कार्यक्रम आयोजित करणे कठीण जाते. अशा संस्थांना सवलतीच्या दरात संस्थेचे सभागृह उपलब्ध करुन देण्याची सोय करून दिली आहे. अनेक संस्थांनी याच लाभ घेतला असून ''एक पंथ दो काज'' या नात्याने संस्थेचेही नाव झाले आहे. अशा संस्थांनी ब्राह्मण सभेला धन्यवाद दिले अहेत. सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून ज्ञातींतील गरीब व गरजू व्यक्तींना वैद्यकीय व शैक्षणिक आर्थिक मदत, अन्य सामाजिक संस्थाना आर्थिक वा वस्तू रुपाने सहाय्य केले जाते.

अपुरी जागा, संस्थेचा वाढता पसारा, वाढती सभासद संख्या आणि नवनवीन उपक्रम या दृष्टीने विचार करता संस्थेची सध्याची वास्तू अपुरी पडते. मंगल कार्यासाठी देखील जागा लहान पडते. यासाठी वास्तूचे नूतणीकरण करण्याची लोकांना अधिकाधिक सोयी व सेवा देण्याच्या दृष्टीने अतिशय गांभीर्याने कार्यकारी मंडळाचा विचार चालू आहे. वाढत्या ठाणे शहराची गरज लक्षात घेऊन संस्थेची एखादी शाखा सुरू करण्याविषयी सतत विचारणा होत आहे आणि त्या दृष्टीने देखील विद्यमान कार्यकारी मंडळ प्रयत्नशील आहे.

**श्री. सुरेंद्र लागू**
यमुना अपार्टमेंट,
जी. बी. रोड, ठाणे.

●●●

### स्फुट

हे संस्कृत विशेषण आहे. याचा अर्थ विकसित, उघड, स्पष्ट, किरकोळ इ. या शब्दांत 'स' ला 'फ' जोडावा व त्याला पहिला उकार द्यावा. 'स्फूट', 'स्फूठ', 'स्पुट' असे लिहू नये.

### मत्स्यावतार

विष्णूने घेतलेल्या दहा अवतारांपैकी मत्स्यावतार हा पहिला अवतार आहे. मत्स्य म्हणजे मासा. या शब्दात 'त', 'स' व 'य' जोडूनच लिहावे लागतात. मत्‌स्यावतार, असे लिहू नये.

### फूत्कार

या शब्दाचा अर्थ आहे रागाचा आवेशयुक्त सुस्कारा. हा संस्कृत शब्द आहे. या शब्दात 'फ' ला दुसरा उकार आहे व अर्धा त 'क' ला जोडावा. 'फुत्कार', 'फुतकार' असे लिहू नये.

### बुभुःकार

वानराच्या ओरडण्याला बुभुःकार म्हणतात. या शब्दात 'ब' ला व 'भ' ला पहिला उकार व या अक्षरापुढे विसर्ग द्यावा. 'बुभुक्कार', 'बूभुक्कार' असे लिहिणे चुकीचे आहे.

### लखलखीत

'ईत' हा मराठी प्रत्यय लागून विशेषण तयार होते. यापासून तयार झालेले शब्द दीर्घ असतात. म्हणून 'लखलखीत' हा शब्दही दीर्घ असावा. 'चकचकीत' हेदेखील याच प्रकारचे उदाहरण आहे.

### पूजनीय

संस्कृतातील 'अनीय' हा प्रत्यय लागून विशेषण शब्द तयार होतो. 'अनीय' हा प्रत्ययच मुळात दीर्घ असल्यामुळे यापासून तयार झालेले शब्दही दीर्घ असतात. 'पूजनीय' या शब्दात 'प' ला दुसरा उकार व 'न' ला दुसरी वेलांटी द्यावी.

*स्थानभ्रष्ट मगरीवर कुत्राही भुंकतो.*

# श्री संत नरहरी सोनार

*मराठी संत परंपरेतील अनेक महान संतांपैकी श्रीसंत नरहरी सोनार महाराजांच्या जीवन व कार्याचा परिचय करून देणारा हा लेख. संतांच्या चरित्राचे पुर्नवाचन व्हावे, प्रसार व्हावा या हेतूने ही मालिका चालू आहे - संपादक*

श्री संत नरहरी महाराजांचे चरित्र उपलब्ध नाही. श्री. नामदेव रायांचे काही अभंग काही अन्यत्र विखुरलेले अभंग, पूर्वापार चालत आलेली परंपरा, काही भाविकांनी जपून ठेवलेल्या दंतकथांच्या आधारे संत चरित्रकार श्री. दा. का. थावरे यांनी महाराजांचे चरित्र त्यांच्या सातशेव्या पुण्यतिथीनिमित्त शब्दांकित केले आहे. संशोधकांच्या कसोटीवर हे चरित्र उतरणार नाही, असे चरित्र कारांनीच स्पष्ट केले आहे. त्यांच्या चरित्र लेखनाच्या आधारे हे लेख संपादित केला आहे.

**ईश्वरनिष्ठा :**

मानवाला जीवानातील स्वास्थासाठी मानवाला ईश्वराची आराधना करावीशी वाटते. मात्र अनित्य भौतिकतेच्या ठिकाणी जडलेली आसक्ती त्याला भगवंताची आठवण करू देत नाही. त्यामुळे ईश्वर विषयक ओढ अशी राहात नाही. काही वेळा मात्र मानव या दृष्टीने प्रयत्न करताना आढळतो. या ओढीने त्याच्या हातून निर्हेतुक साधना झाल्यास ती त्याला ईश्वर प्राप्ती पर्यंत नेऊ शकते. मानवाला ईश्वर निष्ठ होण्याची प्रेरणा संत, सत्पुरुष, वा सद्गुरुकडून प्राप्त होवू शकते. तशी साथ लाभल्यास त्याचे जीवन कृतार्थ होते. भगवंताखेरीज साऱ्या गोष्टी अनित्य आहेत अशी संत शिकवणूक देतात. आणि त्याची ईश्वराबद्दलची निष्ठा वृद्धिंगत करतात. गीतेमध्येही या संबंधी उल्लेख आढळतो. ''अनित्य असुखं लोक इमं प्राप्य भजस्व माम् । मरनवा या जगाची अनित्यता ध्यानात घे व मला सर्वभावे भज ।।''

भगवत् प्राप्तीसाठी अनेकानेक साधने आहेत. त्यापैकी भक्ती हे साधन सर्वात श्रेष्ठ व सुगम असे आहे. त्यातही नामस्मरणासारखी सुलभ साधना नाही. नाम साधनामुळे मन शुद्ध होत जाते. प्रत्यक्ष शंकरानी राम नामाच्या स्मरणाने हालाहाल सारखे विष पचविले. या संदर्भात श्री नाथ महाराज भावार्थ रामायणात म्हणतात - ऐसा श्री रामनाम प्रताप । जेणे विष हलाहल ताप । भस्म झाला आपोआप । ते परम जाप्य जाण माझे ।

**लोक प्रबोधन :**

सात शतकांहून अधिक वर्षे होऊन गेली. श्री ज्ञानदेव प्रभृति संतानी भारतभर भारतीय संस्कार व संस्कृतीने जागरण केले. समाजाला जागे केले. तो गोंधळाचा काळ होता. कर्मकांड व्रत वैफल्ये याना ऊत आला होता. सामान्य जनता आपल्या मनाप्रमाणे वागत होती. कोणतीही वैचारिक बैठक नव्हती. ही स्थिती घालविण्यासाठी आणि जन मानसात स्थिरता आणण्यासाठी संतानी नाम साधन समाजात प्रसृत केले. ही काळाची गरज असल्याचे त्यांना वाटले.

अशा सर्व श्रेष्ठ साधनाची जनमानसात संस्थापना करण्यासाठी निरनिराळ्या प्रांतात निरनिराळ्या ठिकठिकाणी संतांचा मेळा कार्यरत झाला. धर्म हा सबळांचा असून तो सनातनत्व व संत प्रवृत्ती जागविणारा आहे याची जाण संतानी आपल्या आचरणानी समाजाला करून दिली. या संतांच्या मेळाव्यात सर्व जाती जमातींच्या संतांचा समावेश होता. मानव कोणत्याही कुळातला वा जातीतला असो त्याला संतपद प्राप्त करून घेता येते हे रूढ केले.

**पंढरीतील संत मेळा :**

सातशे वर्षापूर्वी असाच संतांचा मेळा पंढरपुरी जमला. ज्ञानदेवांनी त्यांचे नेतृत्व केले. संत चोखामेळा, रोहिदास चांभार, गोरोबा कुंभार, सावतामाळी, नामदेव शिंपी, नरहरी सोनार, सेना न्हावी आदी संत मंडळी विठ्ठल भक्तीने भारून जनसामान्यात परमार्थ विचार समर्थपणे मांडून जन जागरण करू लागली. पंढरीरायाच्या चरणाश्रयाने प्रपंच आणि परमार्थ साधून सर्वजनाना धर्माची, नितीची, सदाचाराची, स्वकर्तव्याचरणाची आपल्या स्वत:च्या आचरणाने गोडी लावली. या संत मंडळीतीलच एक सर्वश्रेष्ठ नरहरी सोनाराची जीवन गाथा अवलोकन करावयाची आहे.

**नरहरी सोनार मूळ घराणे :**

संत नरहरी महाराजांचे मूळ पुरुष श्री रामचंद्र नाईक. हे सदाचार संपन्न होते. त्यांची धर्मपत्नी जानकीबाई त्यांना अनुरूप अशीच होती. हे सुशील, सदाचारसंपन्न दांपत्य पैठणला राहात होते. गोदाकाठी वसलेले आणि नावाजलेले पैठण हे पवित्र स्थान आहे. पैठणला दक्षिण काशी मानले जाते. हे वेद विद्येचे माहेरघर होते. इथे श्री नाईक यांचा सराफीचा व्यवसाय चांगला चालला होता. त्या परिसरात यांचा नांव लौकिकही होता. नाईक धंदा सचोटीने करत तसेच ते स्वभावाचे उदार होते. घरी आलेला याचक रिकामा कधी परतत नसे. जानकीबाई अतिर्थींचे आदरतिथ्य करी. नाईक दांपत्य संपन्न व सदाचाराने युक्त होते. यांना कृष्णदास नावाचा एक मुलगा होता.

जानकीबाईंना परमार्थाची ओढ होती. गुरु दर्शन आणि त्यांचा अनुग्रह व्हावा असे त्याना तीव्रतेने वाटे. पति देवानी त्यांना सांगितले सद्गुरु आपोआप भेटतो. एकदा पंढरीच्या वारीला आलेले हे दांपत्य सिद्धनागनाथांच्या दर्शनासाठी वडवळला गेले. वडवळ येथील सिद्धनाग हे शंकराचे अवतार. त्यांच्या चरणी या दांपत्याने आपला मनोभाव प्रगट केला. त्या गुरू माऊलीने उभयतांना अनुग्रहीत करून कृतार्थ केले. ती उभयता गुरुचरणाची सेवा करीत तिथेच राहिली. आणि सेवा करता करताच उभयतांनी आपले देह वडवळ क्षेत्री श्री गुरुचरणी अर्पित केले.

**कृष्णदास आणि वंशविस्तार :**

आपल्या आई वडिलांनी देह अर्पण केले त्यावेळी कृष्णदास अवघा पांच वर्षाचा होता. त्याच्या मामांनी भाच्याला सांभाळले. त्याला लहानाचा मोठा केला. त्याला वडिलांचा व्यवसाय शिकविला. कृष्णदास स्वतंत्रपणे सराफीचा धंदा सचोटीने करू लागला. कृष्णदासाचा मुलगा हरिप्रसाद तोही व्यापार उदीम करू लागला त्याला एकुलता एक मुलगा मुकुंदराज नावाचा होता. हा देखील पितृभक्त तसेच शिवभक्त होता. त्यांनी काशीक्षेत्री गंगेत देह अर्पण केला. त्यांचा मुलगा मुरारी हा काशीक्षेत्रीच राहिला. हा ही परम शिवभक्त होता. त्यानी काशीनाथाच्या चरणी आपला देह अर्पण केला. मुरारीचा मुलगा अच्युत. हा देखील शिवभक्त होता. वडिलांच्या आज्ञेनुसार काशी सोडून तो पंढरपूरला आला.

**नरहरींचे माता - पिता :**

अच्युत बुवा धर्मपत्नी सावित्रीबाई सह पंढरपूरला आले. ते श्री मल्लिकार्जुनाचे मंदिरात राहिले. तेथेच छोटेसे बिऱ्हाड थाटले. अच्युत बुवा सोनाराचा धंदा सचोटीने करीत होते. ते शिवभक्त होते. हाती वाघेसरी आणि मुखी शिवोऽहम् उच्चारी । नामच उद्धारक शक्ती असल्याचे त्यांना पटले होते.

शंकराच्या कृपा प्रसादाने शके ११९५, श्रावण शुद्ध नवमीच्या दिवशी सकाळी त्याना मुलगा झाला. त्याचे नांव त्यानी नरहरी ठेविले. सातव्या वर्षी त्यांची मुंज केली. पाठशाळेत घातले. तेथे शिक्षण बेताचे होते. बाळपणा

पासूनच नरहरी अंतर्मुख झाला होता. तो परमशिवभक्त होता. शिव या देवते खेरीज तो कोणत्याही देवाचे दर्शन घेत नसे. याच कारणामुळे पंढरपुरात राहून देखील त्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले नव्हते. तो वडिलासारखाच सोनाराचा धंदा सचोटीने करून शिवभक्तीत कालक्रमण करत असे.

**विवाह :**

अच्युत बाबा आता थकत चालले. त्यांना वाटले आपल्यादेखत नरहरीचे लग्न करावे. आणि संसारातून मोकळे व्हावे. मग सारा वेळ देहपातापर्यंत शिवाच्या ध्यानात व स्मरणात घालवता येईल. नरहरीला कुळशील मुलगी सांगून आली. ही ईश्वराची कृपा समजून त्यानी संमती दर्शविली. एका चांगल्या मुहुर्तावर मल्लिकार्जुनाच्या साक्षीने नरहरीचा विवाह संपन्न झाला. प्रपंच व परमार्थ यात समन्वय साधून नरहरीचा संसार सुरू झाला. मनाने शिव नाम स्मरणाचा परमार्थ चालूच होता.

नरहरीची पत्नी गंगूबाई मोठी कुलशील व संस्कार संपन्न होती. तिच्या ठिकाणी आचाराची शुद्धता होती. ती नम्रतेने नरहरीच्या परमार्थाला गोड प्रतिसाद देई. नरहरी निष्णात सोनार होता. स्वकर्म हीच ईश्वराची पूजा असे त्याला ठाम पणे वाटत होते. हातातील कर्माचा हातोडा सोडावयाचा नाही आणि चित्तातील भगवान शंकरही सोडावयाच्या नाही. असे तो रात्रंदिवस वागत असे. रात्री केव्हाही उठावे, मल्लिकार्जुनासमोर बसावे, त्याचे ध्यान करावे, जप करावा, रात्र सरून जावी मात्र जप व ध्यान चालूच राही, असे नरहरीचे वागणे होत असे. शिवसेवा अखंड चालू राहिली.

**आई - वडिलांनी पंढरपूर सोडले :**

वृद्ध आई वडिलानी पंढपूर नजीक कोर्टी गावी आपले बिऱ्हाड थाटले. अधिकाधिक वेळ ईश्वराची आराधना करता यावी हा हेतू होता. उभयता शिवनाम स्मरणात दंग असावयाचे. नरहरी अधुन मधुन कोर्टीला येऊन आई वडिलाना भेटत असे. ती उभयता आता खूप थकली होती. महामृत्यूला सामोरे जावे असे त्यांना वाटू लगले. शिवाची सेव अखंड चालू होती. महाशिवरात्रीच्या दिवशी अच्युत बुवा शिवाची पूजा अर्चा करून बसले होते. शिवाचे स्मरण चालू असताना शिवशंकराचे दर्शन झाले. अच्युत बुवाना आनंद झाला. तुम्ही एकटे कैलासला जाऊ नका मला पण येवू द्या असे सावित्रीबाईनी त्यांना विनविले. त्या दोघांनी शिवशंकराचा उच्चार केला आणि उभयता श्रीशिवाच्या चरणी विसावले.

नरहरी हे पाहात होता. आपल्या आई वडिलांना पंढरीच्या वाळवंटी विसावले. यथा सांग क्रिया कर्म केले. नरहरीला आई वडिलांच्या वियोगामुळे अतीव दुःख झाले. त्याला आता एकाकी वाटू लागले. गंगूबाईनी त्याला समजावले. देह देवाचे, धन हे कुबेराचे, तेथे मनुष्याचे काय आहे. असे पुण्यशील मरण क्वचितच लाभते. आपण भाग्यवान थोडी तरी त्यांची सेवा करता आली. त्यांचे शिवव्रत हेच आपलेही आचरण असावे. नरहरीच्या धर्मपत्नीचे असे प्रगल्भ वागणे होते. या पत्नीच्या सांत्वनाचा नरहरीवर चांगला परिणाम झाला. तो दुःखातून बराच सावरला व नित्याप्रमाणे उद्योग व शिवभक्ती करू लागला.

**नरहरी परम शिवभक्त :**

एकेश्वरी भक्ती पावन करणारी असते. या भक्तीत अन्य देवतांचा अधिक्षेप मान्य नसतो. वास्तविक विचारातील सहिष्णुता हे भगवद्भक्तीचे सूत्र आहे.त्यावरच भक्तीची शक्ती, नीती आणि प्रकृती फुलत असते. यावरच भावाचे, श्रद्धेचे दृढीकरण पुष्ट होत असते. नरहरी सोनार शंकराचे परम भक्त होते. महादेवाच्या देवळातच ते राहात. चंद्रभोजन स्नान, मल्लिकार्जुनाचे पूजन, शिवनाथ उच्चारण असा त्यांचा नित्याचा कार्यक्रम असे.

*झाडे नसलेल्या प्रदेशात एरंड सुद्धा वृक्ष ठरतो.*

**पंढरीरायाची योजना :**

नरहरीच्या मनात समन्वय घडवून आणण्यासाठी विठ्ठलाने एक योजना आखली. एक मोठा सावकार पुत्र संतान नसल्याने नवस करण्यासाठी विठ्ठल दर्शनाला आला. विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवताना त्याने नवस केला. देवा मला पुत्र झाला तर तुला सोन्याचा करगोटा बांधीन. देव नवसाला पावला. पुत्र प्राप्ती मुळे घरात आनंदीआनंद झाला. पंढरपूरला जाऊन कधी नवस फेडून येईल असे सावकाराला झाले. बाळासह तो पंढरपुरी आला. येताना माणिक, मोती, हिरे आणि सोने बरोबर आणले. देवळात गेला. डोळे भरून पंढरीरायाला पाहिले. पुजाऱ्याकडे चौकशी केली. इथे उत्तम सोनार कोण आहे. मला देवासाठी सोन्याचा करगोटा करावयाचा आहे. पुजारी म्हणाला - इथे उत्तम निष्णात सोनार आहे. तो मल्लिकर्जुनाच्या देवळात राहातो. त्याचे नांव नरहरी आहे. बघा तो आपल्याला करगोटा करून देतो का !

सावकार नरहरी सोनारापाशी आला आणि त्याला म्हटले - तुम्ही मला विठ्ठलासाठी करगोटा करून दिलात तर तुमच्या कीर्तीत भर पडेल. नरहरीने त्याला सांगितले तुमच्या देवाच्या कमरेचे माप आणून द्या मी काम चोख करीन. सावकाराने देवाच्या कमरेचे माप व सोने आदी साहित्य त्याला दिले. आपण चांगला करगोटा करा. मी आपणाला या कामगिरीबद्दल दुप्पट कारागिरी देईन. मी जास्तीचे पैसे घेणार नाही असे नरहरीने सांगितले.

सुंदर करगोटा तयार झाला. सावकाराला तो करगोटा दिला. सावकार सहकुटुंब पांडुरंगाच्या मंदिरी आला. पांडुरंगाची महापूजा केली. पूजा संपली सावकार देवाला कडदोरा बांधू लागला. तो मोठा होऊ लागल्याने सावकार नरहरीकडे येऊन तो लहान करून देण्याबद्दल त्याला विनविले. कडदोरा लहान करून मिळाला. सावकार मंदिरात गेला. कडदोरा लहान केल्याने तो कमरेस तोकडा पडला. सावकार चिंतातूर झाला. अत्यंत दुःखाने पुनः तो नरहरीकडे आला आणि म्हणाला सोनार दादा हा कडदोरा एकदा मोठा एकदा लहान होतो; कृपा करून तुम्ही स्वतःच देवळात येऊन माप घ्या. दादा तुम्ही एकदा पांडुरंगाच्या देवळात चला.

सावकाराला थांबवून नरहरी बोलला - शंकराशिवाय मला कोणत्याही दुसऱ्या देवाचे वावडे आहे. शंकराच्या ठिकाणीच माझे मस्तक नत होते. पण व्यवसायनीती सोडावयाची नाही. मी डोळ्यावर कापडी पट्टी बांधून मंदिरात येईन. हाताने चाचपून करमेचे माप घेईन. कडदोरा कमरेला बसेल असे तुम्हाला करून देईन. डोळ्याला पट्टी बांधलेला नरहरी व सावकार यांची जोडी रस्त्याने चालली. सावकारनी नरहरीचा हात धरला होता. लोकाना याचे आश्चर्य वाटले. नरहरी सावकाराच्या मदतीने थेट देवाच्या गाभाऱ्यात आला. पांडुरंगाच्या समोर आला. आणि दोनही हातानी मूर्ती चाचपून पाहिली, त्याला ती भगवान शंकराची मूर्ती भासली. ही मूर्ती पार्वतीनाथांची का पंढरीनाथाची. त्याला संभ्रम झाला. त्याने डोळ्यावरील पट्टी काढली तो समोर पंढरीरायाची मूर्ती. पुनः पट्टी बांधली व चाचपून पाहता शंकर भासू लागला. असे दोन चार वेळा झाल्याने नरहरी अंतर्मुख झाला. माया पटल दूर सारले. समोर घननीळ विठ्ठल कमरेवर हात ठेवून उभा असलेला दिसला. त्याचे रूप पाहून नरहरी हरिरूप झाला. डोळे मिटताच पार्वतीनाथाचे दर्शन झाले. डोळे उघडून आपल्या हातातील कडदोरा विठ्ठलाच्या कमरेला बांधला. तो बरोबर झाला. सावकार आनंदित झाला.

**दैत सरले ;**

आता नरहरीने पांडुरंगाच्या पायास घट्ट मिठी मारली. आपल्या अश्रूंना वाट करून दिली. देवा अजाण बुद्धीने मी द्वैत जोपासले. अहंकाराने मी तुझ्या दारी देखील आलो नाही. माझा अपराध पोटी घाल. नरहरीच्या हृदयाचे

स्थान विठ्ठलाने पूर्णपणे बळकावले त्याच्या मुखातून परस्पर्श वाणी श्रवू लागली -

नाम हे नगरी वैकुंठ पंढरी । नांदतो श्रीहरी पांडुरंग ।
नरदेही जन्मले पंढरीस गेले । दृष्टीभरी पाहिले पांडुरंग ।
भावरेचे स्नान देवाचे दर्शन । पाप हे जळोन जाय तेथे ।
चरणावरी गाभा नरहरी ठेविला । हृदयी बिंबला पांडुरंग ।

नरहरींनी दृष्टी दर्शनानेच विश्व व्यापक झाली. त्याच्या ठिकाणी अद्वैत भाव उचंबळून आला. त्याने पांडुरंगाला कडकडून मिठी मारली.

पांडुरंगाने त्याला पोटाशी धरले व म्हटले - अरे तू जन्मभर ज्याचे चिंतन स्मरण करतोस तो पार्वतीनाथ मी मस्तकी गौरविला आहे. नरहरीने वर पाहिले तो पार्वतीनाथ देवाच्या शिरी विराजमान असल्याचे पाहिले. नरहरी गहिवरला. नरहरीच्या डोळ्यासमोरून विटे वरील सावळा पुतळा दूर जाईना. आत बाहेर तोच दाटला. नरहरी महाराजांच्या भक्तीस आता व्यापकता आली. संतांच्या मेळ्यात ते सामील झाले. नामदेव रायांचा सहवास त्यांना नित्य लाभू लागला. दिवसें दिवस भक्त लोकांची संख्या वाढत चालली.

**नाम महात्म्य :**

परमार्थातील सकळ साधनात सर्वांत श्रेष्ठ आणि सोपे साधन म्हणजे नामस्मरण. सर्वच संप्रदाय वा धर्मपंथ नामस्मरण भक्तीचा पुरस्कार करणारे आहेत. त्यामुळे भक्तिमार्ग सर्वानाच चोटवाळता येतो. इथे जात, वय, स्त्री, पुरुष, लिंग भेद, ज्ञान, अज्ञान अगर पुण्यवान, पतित या सर्वानाच नामाचा सारखा अधिकार आहे. कोणालाही इथे आडकाठी कोणत्याही प्रकारची नाही. ईश्वर भक्ति प्रवाहात सर्वजण अवगाहन करू शकतात.

**नरहरी महाराजांचे वैशिष्ट्य :**

शिव विष्णु या मूर्तींची रूपे एकच. हे विटेवर साक्षात त्यांनी पाहिले. तेव्हा पासून त्यांनी अव्दय भक्तीच्या पुरस्कार केला. चिंतनी तद्रूपता पावणाऱ्या नरहरींच्या नयनीचा नयन उघडला. ते म्हणतात -

शिव व विष्णु एकचि प्रतिमा । ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित।

धन्य ते संसरी नर आणि नारी । वाचे हरहरी उच्चारीत ।

नाही पै भेद अवघा मनी अभेद । द्वेषाद्वेष संबंध उरी नुरे ।

सोनार नरहरी न देखे द्वैत । अवघा मूर्तिमंत एकरूप ।

भक्तीची परिसीमा म्हणजे विरक्ती, अंत:करणातून नाम न जाणे हेच वैराग्य. मी माझे विसरणे म्हणजेच वैराग्य. ते म्हणतात -

संसारी असावे । असोनी नसावे । हीच वीतरागता, नरहरी महाराजांच्या ठिकाणी या साऱ्या खाणाखुणा होत्या.

**सर्व जायाचे जायाचे :**

नरहरी महाराजांचा ज्ञानदीप आता वैकुंठाच्या तयारीला लागला. नरहरी देवासमीप आले. पांडुरंगाकडे डोळे लावले. आणि म्हणाले -

देवा मुक्ती नको भक्तपद ठेवी । ठावे माते देई निजपुरी ।

माझ्या हाती क्रिया जेथे लखलखीत । कटी सूत्रक जेथे तेथे ठेवी ।

भक्त तेथून पाहीन लोचना । पुरवी वासना नरहरीची ।

शके १२०७ माघ वद्य तृतीया पार्थित नाम संवत्सर हा दिवस उगवला. याच दिवशी नरहरी सोनार महामृत्यूला हसत सामोरे गेले. त्या दिवशी महाराजांनी चंद्रभागेचे स्नान करून माऊलीला दंडवत घातले. मल्लिकार्जुन मंदिरी येऊन शिवास वंदन केले व शेवटी म्हणाले -

शरीराची होय माती । कोणी न येती सांगाती ।

सारी अवघे कामे खोटी । अंती जाणे मसणवरी ।

गोत घरे टाकून सारे । शेवटी गावाचे बाहेरी ।

स्वगत आणि गण गोत । उपाय नाही हो चालत ।

ऐसी स्वप्नवत असार । नरहरी जोडितसे कर ।

घरच्यांचा निरोप घेतला. सर्व मंडळींसह पांडुरंगाच्या राऊळी आले. सर्व सज्जनाना वंदन केले. चुकीची क्षमा मागितली. मी दूर जात नाही. विठ्ठलाच्या कटीवरच मी विसावणार आहे. आम्ही गुप्त होऊ विठ्ठलाचे कटी । नरहरी भेटी घ्यावी तेथे । विठ्ठलाकडे न्याहाळून पाहिले. आणि त्याच्या चरणावर आपले मस्तक ठेविले. सर्व देहभाव समर्पित झाला. नरहरींची प्राणज्योत विठ्ठलाच्या कटीत समाविष्ट झाली. नरहरी नारायणमय झाला.

सर्वांच्या देखत हे घडले. नामदेव म्हणतात - नामा म्हणे तेव्हा होतो मी जवळी । नरहरी वनमाळी एक झाला। नर असलेले हरीरूप झाले. काहीच शिल्लक उरले नाही. आपल्या भक्तीचा गाजावाजा न करता शेकराशी एकनिष्ठ राहून विश्वरूप दर्शन नंतर अद्वत भक्तीचा पुरस्कार केला. अहंकार विरघळला. सर्वत्र पांडुरंग दिसू लागला. पांडुरंग न कळे आम्हा । नरहरी सप्रेमा सद्‌गदीत । अशी अवस्था झालेला हा महात्मा पंढरीचे भूषण ठरला. किंबहुना पंढरीचे वैभव ठरला.

या लोकोत्तर साधूची जीवन गाथा कर्तृत्व आणि कार्य तसेच काव्य समृद्ध आहे. त्यांच्या भक्तीचा आदर्श कधीही न विसरला जाणारा असा आहे. अशी नरहरी महाराजांची जीवन गाथा. असा नरहारी महाराजांचा जन्म भराच्या जीवनाचा सुगंध होता. ते सर्व ईषणापासून दूर राहिले आणि देव सान्निध्य मात्र प्राप्त केले.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राममारूती पथ,
ठाणे (प.) ४०० ६००.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

### व्यक्तीकरण

याचा अर्थ आहे प्रकटीकरण, स्पष्टीकरण. हा शब्द लिहिताना हमखास 'व्यक्तिकरण' असा लिहिला जातो. तसे लिहिणे चुकीचे आहे. या शब्दात 'क्त'ला दुसरी वेलांटीच हवी.

### शिलाई

'आई' हा मराठी प्रत्यय लागून धातुसाधित नाम तयार होते. 'शिलाई' या शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असते. 'शिलाई' या शब्दात 'श' ला पहिली वेलांटी व दीर्घ 'ई' लिहावा.

### शिखा

याचा अर्थ आहे शेंडी, तुरा, कलगी, अग्नीची ज्वाला, पावसाची लहान सर. या शब्दात 'श' ला दुसरी वेलांटी न देता पहिली द्यावी. 'शीखा' असे लिहिणे चुकीचे आहे.

### सडीक

सडणे या धूतूस 'ईक' हा मराठी प्रत्यय लागून 'सडीक' हे विशेषण तयार होते. प्रत्ययच दीर्घ असल्यामुळे विशेषण शब्दातील वेलांटी दीर्घच असते.

### पाळीव

'ईक' जसा मराठी प्रत्यय आहे, तसाच 'ईव' हाही आहे. या प्रत्ययापासूनही मराठी शब्द तयार झाले आहेत. 'पाळीव' हा त्यातीलच एक शब्द. हा शब्दही दीर्घच लिहावा. आणखी काही उदाहरणे रेखीव, आखीव इ.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे. - संपादक*

**प्रास्ताविक :**

इ. स. २००८ या वर्षी 'स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर' ह्या औपचारिक पद्धतीने चाललेल्या केंन्द्राच्या दोन सभासदांची दोन पुस्तके - म्हणजे



**Dr. Apte**

**डॉ. शांताराम परशुराम आपटे**, यांचे '**वैदिक आन्हिक**' आणि, **श्री. शंकर मठ, विश्वस्त, कौपिनेश्वर मंदिर**, ठाणे, यांचे ''**भारत वर्षाची सांस्कृतिक घडण**'', ही दोन पुस्तके प्रसिद्ध झाली.

काय आहे ह्यांत महत्वाचे ? '**भारतीय संस्कृती**' ह्या अत्यंत महत्वाच्या **संकल्पनेचे जे वर्णन** आज जगांत व भारतातही प्रचलित आहे, ते त्या संकल्पनेवर '**अन्याय**' करणारे आहे.

एकतर ह्या संस्कृतीचे जे दर्शन केवळ ''**भौतिक स्तरावर**'' होते आहे, हे केवळ बहीर्गत आचार, विचार,




**भारतवर्षाची सांस्कृतिक घडण**

सण, धार्मिक कृत्ये या दर्शनावर आधारलेले व तसेच जाणले जाते आहे.

**संस्कृति व सनातन धर्म :**

पण, '**सनातन धर्म**' (**Eternal Law of the universe**) या संकल्पनेवर आधारलेल्या ''**भारतीय संस्कृतीचा प्रवाह**'' आकाशातील आकाशगंगेच्या स्त्रोतासारखा अव्याहत चालू आहे याचे भान या जगाला नाही आहे. 'वेद' ह्या ईश्वरनिश्वासित ज्ञान (विद्या, अविद्याही) हा या संस्कृतीचा आधार व दिशा आहे. मानवी इतिहासाच्या जाणीवेच्या संदर्भात कमीतकमी १०,००० वर्षे - म्हणजे वेदिक कालगणनेच्या संकल्पनेत पृथ्वीची

१०,००० भ्रमणे ह्या सूर्यासभोवती होत आली आहेत, व हया प्रचंड कालओघात ह्या पृथ्वीवर जो भूभाग 'भारत' ह्या संज्ञेने जाणला जातो, त्या भूभागावर, गंगा, यमूना, कावेरी, गोदावरी, ब्रह्मपुत्रा, नर्मदा वगैरे नद्यांच्या काठांवर व सहाय्याने 'मानवी देहाच्या' स्वरूपात व माध्यमातून आपले वैश्विक अस्तित्व संभाळून कार्यरत आहे. ही संस्कृती सनातन आहे, जिवंत आहे, वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहे, मानवी देहाला व जीवनाला उंची देणारी आहे.

काय आहे ह्या जड - जड शब्दांचा अर्थ ? महायोगी अरविंदांच्या शब्दात 'दिव्य जीवन' 'Life Divine' ह्या दैवी स्वभावाच्या प्राप्तीकरिता धडपडणाऱ्या संस्कृतीचा हा प्रवाह जीवंतपणे, संथपणे पण निश्चयाने मार्गक्रमण करीत आहे.

ह्या 'दैवी संस्कृतीचे' दर्शन व भार काही मानवाच्याच शिरावर नाही तर त्या संस्कृतीच्या प्रवाहात वनस्पती, प्राणी, पर्यावरण, निर्जीव वस्तूही सामील आहेत. तसेंच ग्रह, तारे, चंद्र, सूर्य, ध्रुवतारा सगळा खगोल सामील व कार्यरत आहे.

**वैश्विक अग्नि संस्कार व संस्कृती :**

हे **रासायनिक दिव्य मिश्रण** ज्या वैश्वानर, गार्हपत्य, दाक्षिणाग्नि, आहवयाग्नि व इतर अनेक अग्निप्रकारांवर संस्कारित होत आहे व त्यांतील चैतन्यशक्तीचे रूपांतर एका '**दिव्य चैतन्यशक्तीत**' करीत आहे. त्याची पुसटशी कल्पनाही समाज शास्त्रज्ञ, राजकारणवादी विचारवंत व भौतिक पदार्थ विज्ञान व इतर शास्त्रज्ञांना नाही. 'Consciousness', (चैतन्यशक्ति) ह्या ज्या संकल्पनेचा बोध होण्याचा 'अजेंडा' आज पाश्चात्य तत्वज्ञानी व भौतिक शास्त्रज्ञानी, आपल्या विचारांत घेतला आहे त्यांना ह्या 'वैश्विक यज्ञाची'' सुतराम कल्पना नाही.

**स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर दोन प्रयत्न :**

पण, मग ठाण्यातील ह्या आमच्या दोन विव्दानांनी ह्या दोन पुस्तकांद्वारे असे कोणते पाऊल टाकले आहे कीं ते या वैश्विक कार्यक्रमाची दखल घेताहेत असे वाटावे ?

बरोबर आहे हा प्रश्न. ह्याचे उत्तर जरा विस्तारानेच द्यावे लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे 'मानवी देह' ह्याकडे ही संस्कृती, हा देह, हे एक पृथ्वीवर लाभलेले जीवात्म्याचे वाहन व साधन म्हणून पहाते. ही संकल्पना वेद ज्ञानावर लाभलेली आहे. ह्यालाच नवीन संज्ञा म्हणजे 'Embodied Consciousness' देहात्म चैतन्य, म्हणजे देहाच्या आकारात बंदिस्त अश्या जीवात्म्याच्या स्वरूपात पहाते. देह ह्या संज्ञेचा निरूक्तपध्दतीचा अर्थ छंद युक्त आवरण व अनुसंधान (Linking Capacity) आहे. ह्या संकल्पनेची मोडकी तोडकी स्वरूपे जगातील इतर धर्मात वा संस्कृतीमध्ये सांपडतील. पण, भारतीय वेदिक संस्कृतीत ही संकल्पना पूर्णपणे शास्त्रीय बैठकीवर आधारीत किंवा वैज्ञानिक अर्थाने परिपूर्ण असलेली आढळेल. वेद, उपनिषद, भगवद्गीता व 'सहा दर्शने' ह्यांच्या सामूहिक व सुसंवादी अभ्यासाने ही संकल्पना मूर्त स्वरूपांत कोठलाही मानव जाणूं शकेल.

एव्हढेंच नव्हे, तर मानवी देहाचा जन्म व नंतर होणारी Biological Growth देहाची वृद्धी व नंतर होणारा क्षय व मृत्यू ह्या सगळ्या ढोबळ देखाव्याच्या मागील जीवात्म्याचा देहांतर्गत प्रवास व नंतर देहत्याग हे सर्व जाणण्याचे, अनुभवण्याचे साहित्य, तंत्र व साधना.

ह्या संस्कृतीने निर्माण केल्या आहेत व संभाळल्या आहेत. मंत्र, योग, तंत्र, यंत्र, भक्ति वगैरे त्यांतील प्रमूख नांवे आणि त्या प्रत्येकाचे वेगळे असे स्वतंत्र शास्त्र आहे व त्याचे जतन, प्रसार हे निरनिराळे संप्रदाय त्या त्या शास्त्रांना

वाहून देऊन आणि टिकवून व संवर्धित करीत आहेत. ज्या जीवात्म्याला ह्या 'आध्यात्मिक' उन्नतिच्या कार्यक्रमातून संक्रमण करावयाचे आहे त्याकरितां १६ संस्कार क्रिया ह्या परिपूर्ण अवस्थेत संभाळल्या आहेत.

अडचण एवढीच, पण, मोठ्ठी आहे कीं ह्या सगळ्या सांस्कृतिक उद्योगाची संपूर्ण जबाबदारी ही स्वत:वर घेणारी अशी सामाजिक यंत्रणा एका समर्थ छत्राखाली व सुसज्ज अशी अस्तित्वात नाही !!

**वैदिक आन्हिके :**

आतां पुन्हा एकदां आपल्या दोन पुस्तकांच्या महत्वाकडे वळू या. डॉ.शांताराम आपटे ह्यांनी भारतीय संस्कृतीत जी 'कर्मकांडे' नावाने क्रिया ओळखल्या जातात, त्याचा अत्यंत विस्तृत संग्रह 'वेदिक आन्हिके' ह्या शीर्षकाखालील ९६२ पानांचा ग्रंथराज छापला आहे. त्याचे उद्घाटन **डॉ. मुरली मनोहर जोशी** यांच्या हस्ते ठाण्याच्या रंगायतन वास्तूत ता. १६/३/२००८ रविवारी झाले. लोकसभेचे निवृत्त स्पीकर व माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी व भा.ज.प. चे उपाध्यक्ष श्री. बाळ आपटे ही मंडळी हजर होती.

डॉ. शांताराम आपटे यांचा हा प्रयत्न म्हणजे पृथ्वीवर जन्माला येणाऱ्या जीवात्म्याच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. भारतीय वेदिक संस्कृतीत जो Evolution of consciousness चैतन्य शक्तीच्या उत्क्रांतीचा मार्ग आहे. त्या मार्गावर त्याला ज्ञान, जाणीव, कर्तव्य व बुद्धी प्राप्त होण्याची गरज आहे. नाहीतर, तो प्राणीवृत्तीच्या जीवन शैलीचा 'कळत नकळत' एक भागीदार व भोगवृत्तींचा साधक होऊन राहील. जीवन उद्दिष्टांचा एव्हढेंच नव्हे तर स्वत:च्या वैश्विक स्वार्थाचाही (परमार्थाचा) परिचय न होता तो जीवन संपवेल. संधी घालवेल - जीवन व्यर्थ जगले असे होईल. हा सत्य व ऋत यांचा परिचय पाश्चात्य भोग संस्कृती व जड विज्ञान विचारवादी आवश्यक मानत नाही. कां असे होते ? मला हा प्रश्न कित्येक वर्षे ग्रासून राहिला होता. ज्या Objective Reality 'वस्तुनिष्ठ सत्याचा' आग्रह भौतिकवादी तत्वज्ञान व विज्ञान धरते त्यांची सत्याची व्याख्या, त्यांच्या सांप्रदायिक वृत्तीमध्ये अडकून विकृत झाली आहे. उलट, ते धर्म, अध्यात्म या वेदिक ज्ञानावर अत्यंत अज्ञानाने व हेतूपुरस्सर हल्ले करीत आहेत. याची थोडी ओळख आपण 'The end of science' ह्या John Horgan (1996, Broadway Books, us 16.00 ISBN o - 553 - o 6174-7) ह्या पुस्तकाचे वाचन केल्यावर समजेल. हॉर्गन हा एक अमेरिकन सायन्स रिपोर्टर आहे व त्याने **रॉजर पेनरोझ, फ्रॅन्सिस क्रिग, रिचर्ड डॉकिन्स, फ्रीमन डायसन, मुरे जेल. मान, स्टीफन जे गाउल्ड, स्टीफन हॉकीन्स, थॉमस कुन्ह, स्क्रीस लँगटन, कार्ल पॉपर, स्टीव्हन विनबर्ग, ई. ओ. विल्सन, नोएम् चोमस्की, जॉन व्हीलर, पॉल फेयरबेन्ड, फ्रॅन्सिस फुकूयामा, फ्रेड हॉयल, स्टुअर्ट कॉफमन, लिन मारगालिस, मार्विन मिन्स्की, हॅन्स मोरॅव्हेक, इल्या प्रिगोजिन, गुंथर स्टेन्ट, फ्रँक टिपलर, गेल्डन ग्लॅशो, एडवर्ड विटन, डेव्हिड श्राम, जॉन एकलस, फिलीप अँडरसन, ग्रेगरी चॅटिन, चार्लस हार्टसशोर्न, बॅटले ग्लास, लियो कॅडेनॉफ, हॅन्स बेथे, स्टॅनले मिलर, अँड्रे लिंडे, मिचेल फिगेन बॉम** सारख्या 'नोबेल प्राइझ' जिंकणाऱ्या वा तत्सम अधिकार असलेल्या आधुनिक काळातील पाश्चात्य जगाच्या संस्कृतीत बुडलेल्या अधिकारी व्यक्तींची स्वत: भेट व चर्चा करून कांही निष्कर्ष त्यांच्याच तोंडून वदवले.

हे सर्व त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात अधिकारी आहेत. **फिलॉसॉफी, फिजीक्स, कॉसमॉलॉजी, बायॉलॉजी, सोशल सायन्स, न्यूरोसायन्स, केओप्लॅक्झिटी, लिमीटोलॉजी, सायंटिफिक थिऑलॉजी, मशिन सायन्स** वगैरे वगैर ही त्यांची अधिकाराची क्षेत्रे.

<u>मुख्य प्रश्न, सत्य ज्ञान</u> :

**काय होता मुख्य सवाल? प्रश्न होता कीं 'मानवाला सत्यज्ञान' भौतिक विज्ञानाच्या मार्फत प्राप्त होईल कां? होऊ शकेल कां ? ह्या दोन्हीची उत्तरे '<u>नाही</u>' अशी मिळाली.**

हॉर्गन ह्याने ज्या भौतिक विज्ञानाच्या महाभागांना हा प्रश्न विचारला. ती सर्वसामान्य माणसे नव्हती आपआपल्या शास्त्र संप्रदायातले ते नांवाजलेले व अत्युच्च्य शिखरावर आरूढ असलेले मानव होते. प्रामाणिक, विचारवंत, तल्लख बुद्धीमत्ता असलेले व अत्यंत स्वतंत्र व स्वयंभू प्रज्ञेचे अधिकारी होते.

त्यातील एक उत्तर **पॉल डेव्हिस** यांचे असे, 'The Mind Of God', या पुस्तकात १९९२ साली हे पदार्थ विज्ञान शास्त्रज्ञ म्हणतात की,

"He pondered whether we humans could attain absolute knowledge - The answer - through science." Such an outcome was unlikely, Davis concluded, given the limits imposed on rational knowledge by quantum indeferminacy, Godel's theorem chaos and the like.

Mystical experiance might provide the only avenue to absolute truth, Davies Speculated.

He added that he could not vouch for this possibility, since he had never had a mystical experiance himself.

ह्याचे कारण **थॉमस कुन्ह** ह्याने दिले आहे. त्याच्या मताने वैज्ञानिक प्रत्येक जण आपल्या एका विशिष्ट अशा चौकटी मध्ये विचार करतो. तो आपल्या बुद्धीला त्या चौकटीमध्ये बांधून टाकतो - नकळत - न बघता !! ह्या चौकटीला कांही गृहीते - 'न तपासलेली' - म्हणजे निखळ सत्याच्या कसावर वा सहाणेवर न तपासलेली, अशी असतात. ह्याची त्याला सुतराम जाणीव नसते. ती कोणी




**Thomas Kunh**

करून देण्याचा प्रयत्न केल्यास तो आपल्या स्वत:च्या '**पॅरेडिमच्या**' ज्ञानाच्या चौकटीच्या बळावर विरोध करतो. उडवून लावतो. वकीली थाटात विचार करतो. आत्मपरिक्षा करीत नाही. कांही त्याला अज्ञात असे '**ज्ञानाचे मार्ग**' त्याच्या विश्वासाच्या चौकटी बाहेर असूं शकतील हे मानत नाही. '**Pardigm Shift**'म्हणजे एका चौकटीच्या विश्वासातून दूसऱ्या चौकटीतही प्रवेश करू शकत नाही.

<u>फेयर बेंड</u> :

फेयर बेंड तर म्हणतात, 'I object to the claim that science is Superior to other modes of knowledge'

ते तर पुढे म्हणतात कीं हे भौतिक विज्ञानवादी आपल्या विज्ञानाच्या संकल्पना व प्रोजेक्टस जनतेवर राजसत्तेच्या, शिक्षणाच्या माध्यमातून, नियंत्रणातून लादतात.

त्यांनी तर अशी मागणी केली कीं जसे धर्म व राज्यसंस्था वेगळ्या करण्यात आल्या तसेच विज्ञान व



फेयर बेंड

राज्यसंस्था ह्यांचे मिश्रण तोडावयाला हवे. विज्ञानाला आज राजाश्रय आहे व वैज्ञानिकांना व त्यांच्या संकल्पनांना व उद्योगांना विचार न करता पैसा मिळतो, कीं जो खरोखर जनतेचा असतो व त्यांना ह्या विचारात, निर्णयात भाग घेण्याचा अधिकार सर्वसाधारणपणे नसतो व ती जनताही ह्या अपुऱ्या, तोकड्या विज्ञानाने भारलेली असते.

**<u>अध्यात्मशास्त्र व समाज जीवन आणि ध्येये</u> :**

**आपल्या विषयाला ह्या गोष्टींचा काय संदर्भ?** डॉ. शांताराम आपटे ह्यांचे पुस्तक किंवा ग्रंथराज हा वैयक्तिक साधनेच्या संदर्भात, जी नित्य आन्हिके करावयाला हवीत त्यांचे एक उत्कृष्ट डॉक्यूमेंटेशन (संदर्भ ग्रंथ) म्हणता येईल.

पण, कां करावयाची ही 'आन्हिके'? ह्याचे उत्तर शोधावयाला त्या आन्हिकांच्या मागे ज्या ऋषी मुनींचे विचार आहेत ते बघावयाला लागतील. एव्हढेंच नव्हे तर ज्या कोणी ऋषीने ही आन्हिके व त्यांची रूपे -बहिर्गत व अंतर्गत साधनेच्या स्वरूपांत संकलपली, त्यांचा ईश्वरनिश्वसित वेद ज्ञानाच्या प्रकाशात तलास घ्यावा लागेल.

कारण, ह्या आन्हिकांचा हेतू हा 'जीवात्मा' ज्या काळात, वातावरणात, समाजात, ह्या पृथ्वीवर देहबद्ध अशा स्थितीत प्रवास करणार आहे, त्याच्या शुद्धीचा, उन्नतीचा प्रश्न गुंतला आहे. तेव्हां, स्वत:च्या शरीराचे आत्म्याचे व विश्वाचे पूर्ण ज्ञान नसलेल्या, एखाद्या निरागस पण अज्ञानी मुला सारखा त्याचा १०० वर्षाचा प्रवास आहे. हा प्रवास कोणता? उद्दिष्ट काय? शेवट काय? विनीयोग कोणता? मदत करणाऱ्या देवता (शक्ती) कोणत्या? वगैरे वगैरे.

**<u>मानवी संस्कृतीचा निराळा पण सत्य मार्ग</u> :**

ह्या सर्व साधना व उपायांच्या मुळाशी एक मूलभूत संकल्पना आहे. ज्या भौतिक विज्ञानाला 'अंतिम सत्य' ह्या विश्वाचे उलगडू शकणार नाही, त्या विज्ञानाच्या ज्ञानपद्धतीपेक्षा अगदी निराळा मार्ग भारतीय संस्कृतीतील वेदिक ज्ञानाचा व साधनांचा आहे. त्यामध्ये, जीवात्म्याला ह्या देहबद्ध व मर्त्य देहाच्या आवरणाच्या आंत प्रवास करणाऱ्या जीवात्म्याला आपल्या स्वत:चे ज्ञान व जाणीव ह्या पृथ्वीवरच होणे आवश्यक आहे. ह्याला पर्याय नाही. विश्वाचे सत्य ज्ञान, आणि स्वत:चे ही सत्य अस्तित्व ह्यांचे खरे ज्ञान होण्यासाठी देहाच्या व पृथ्वीवरील व विश्वातील दैवी, स्पिरीच्यूअल शक्तींची मदत घेऊन जी योग साधना आहे. जो आत्मयज्ञ आहे, त्या मार्गाचा अवलंब करावा लागतो !!

**<u>त्यामुळे, डॉ. आपटे ह्यांच्या वैदिक आन्हिके यामधील पान ५१९ वरील 'न्यासविद्या' व पान ५२१ वर महानारायणउपनिषदातील त्रिसुपर्णा ह्या साधना बद्दल सांगितलेल्या माहितीचा परिचय करून द्यावा लागेल.</u>**

आतां, हे साधना वर्णन पुष्कळ गूढ वाटेल पण, मी '**<u>दिशाच्या</u>**' अनेक अंकामध्ये '**<u>यज्ञ</u>**' ह्या संकल्पनेवर जे

*दान, उपभोग व नाश हे पैसा जाण्याचे तीन मार्ग आहेत.*

विस्तृत विवेचन, संकल्पना सांगितल्या आहेत, त्यांची उजळणी करावी लागेल. पुढच्या कांही 'दिशाच्या' अंकात मी त्यावर सविस्तर भाष्य करण्याचे योजिले आहे.

**<u>अध्यात्मशास्त्र व संस्कृतीची वाटचाल</u> :**

आतां, आपण **श्री. शंकर मठ** यांचे 'भारत वर्षाची सांस्कृतिक घडण' ह्या पुस्तकावर विचार करूं या.

ह्या पुस्तकावर **मी एक परीक्षण लोकसत्ता** ह्या दैनिकामध्ये **पान ६** वर दिले आहे. हा अंक रविवार ता. **२७ एप्रिल २००८** चा आहे. तो जरूर नजरेखालून घालावा.

श्री. मठांनी अत्यंत समर्थपणे 'अध्यात्मक्षेत्रात' भारतामध्ये झालेल्या विचार प्रवाहांचा, पंथांचा, तत्वज्ञानांचा प्रवास मांडला आहे.

मी भारतातील मानवी समाजात जे वैचारिक बदल झाले त्याची भौतिक वाद्यांनी कशी दखल घेतली ह्याबद्दल कॉम्रेड देवीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्या 'लोकायत' ह्या ग्रंथाचा मुद्दाम उल्लेख केलेला आढळेल.

**<u>भौतिक समाज शास्त्रांची गंभीर गफलत</u> :**

<u>काय आहे याचा अर्थ व संदर्भ</u> ? एकतर 'मानवी समाज' ह्यामधील प्रत्येक मानवी घटक किंवा व्यक्ती ही मर्त्य आहे. त्यामुळे हजारो वर्षे व युगायुगांत अस्तित्वात असणाऱ्या समाजाकडे कसे बघावयाला हवे?

भौतिकवाद्यांच्या जीवनाच्या संदर्भात 'समाज' ही एखादी Fixed Entity स्थिर चीज आहे असा चुकीचा समज असतो. कारण, बदल कोणाच्यात बघितला जाऊ शकतो? ज्या गोष्टीमध्ये एखादे सातत्य काळाच्या बदलातही असेल तरच तुलना होईल !! मग प्रभू राम, रामाच्या काळातील समाज, औरंगजेबाच्या काळातील समाज वा लॉर्ड डलहौसी, माऊंटबॅटनच्या काळातील समाज व आतां सोनिया गांधी व वाजपेयी ह्यांच्या काळातील भारतीय समाज हा काही एक पक्की चीज नव्हे कीं ज्यामध्ये तुलना होऊ शकेल. त्यातील प्रत्येक व्यक्ती बदललेली आहे. मग, तुलना कोणाची? ह्या Ever changing fiux ची? नित्य, नव्या येणाऱ्या जीवांची कीं, ज्यांचा ऐतिहासिक जुन्या व्यक्तींशी कांही संबंध नाही.

ह्या अडचणीवर कधीही गंभीरपणे विचार झाला नाही. कां नाही? तर पृथ्वीवरील मानवी व्यक्तीचे अस्तित्व हे 'One time life' असे मानणे !! ख्रिश्चन व इस्लाम असेच मानतो व भौतिकवादी तर या पलीकडे बघतच नाहीत !!

उलट, भगवद्‌गीतेत अर्जुन, भगवान कृष्णाला विचारतो कीं या जीवनात मला जे ब्रह्मज्ञान तुझ्या मार्फत झाले तर ते माझ्या मृत्यूनंतर माझ्या पुढच्या जीवनात कामाला येईल किंवा नाही.

त्याला उत्तर मिळाले कीं त्याचा अशाच ठिकाणी व अशा कुळात जन्म होईल कीं जिथे ह्या ज्ञानाचा पुढचा प्रवास चालू राहील.

ह्याचा अर्थ शरीर हे मानवी व्यक्तीचे स्वरूप मानणाऱ्या भौतिकावाद्यांना समाजाच्या सातत्याचा संदर्भ देण्याचा अधिकार नाही.

उलट, ज्या वेदिक संकल्पनेमध्ये जीवात्म्याचा जन्मजन्मांतरीच्या व युगायुगांचा वैश्विक प्रवासात त्याला मिळणाऱ्या शरीराचा अर्थ केवळ एक कालबद्ध मर्त्य आवरण असे मानले जाते व असा सत्य विश्वास आहे, त्यांनाच जीवात्म्याच्या चैतन्यशक्तींतील बदल टिपण्याचा व सांगण्याचा अधिकार आहे.

मला ही भौतिकवाद्यांची चूक गंभीर वाटते. ह्या मुद्यावर आपण दिशाच्या पुढील अंकात विचार करूंच, पण त्याचबरोबर श्री. मठाच्या ह्या अध्यात्मशास्त्राच्या प्रवासाचा चित्रलेख कां महत्वाचा हे सांगावेच लागेल.

*लोभातून पापवृत्ती वाढते.*

मानवी बुद्धीच्या युगायुगाच्या प्रवासात जी प्रगती झाली ती कौतुकास्पद आहे. त्यामुळे, त्याच्या भौतिक जीवनांत जे दृश्य बदल झाले त्याचा इतिहास मांडला गेला आहे.

पण, त्याच्या उत्तरोत्तर प्रवासात जो सत्याचा शोध चालूं आहे, तो केवळ 'धर्म' संकल्पनांच्या मार्फतच बघितला जाऊं शकतो.

आता 'धर्म' म्हणजे रिलीजन असा एक गैरसमज आहे. मी ज्या धर्म संकल्पनेतील बदलाचा उल्लेख करतो आहे, तो म्हणजे Organised Religion म्हणजे हिंदू, जैन, बुद्ध, ख्रिश्चन, इस्लाम वगैरे वगैरे संज्ञांचा.

हे 'धर्म' तुलनात्मक रित्या अभ्यासण्याऐवजी आपण एका बाजूला फक्त युद्ध, संघर्ष व रक्तपातच पाहिला. असे कां?

ह्याचे एक मुख्य कारण म्हणजे हे धर्म बहुतांशी भौतिकवादीच होते. दोन तीन डझन सामाजिक, व्यक्तीगत जीवनमूल्ये, रितीरिवाज वा नियम व फसव्या श्रद्धा व समज यावर आधारलेल्या ह्या धर्म संकल्पना.

त्यामुळे, त्या संकल्पनेच्या बळावर समाजावर, देशावर राज्य करावयाचे एव्हढाच त्यांचा दृश्य हेतू, त्यामुळे राष्ट्रांवर आक्रमण, जुलमाने किंवा बनवून, फसवून, भौतिक किंवा काल्पनिक स्वर्गातील आमिषे देऊन केलेली धर्मांतरे, ही त्यांची ढोबळ दर्शने.

**<u>सामाजिक भौतिक धर्म, समधर्म समभाव व सनातन धर्म</u> :**

ह्या अशा भौतिक धर्म संकल्पनेतून अजूनही ह्या जगातले धर्म बाहेर पडलेले नाहीत. आणि, मग हे धूर्त राजकारणी यांनी खऱ्या धर्माचा शोध होऊन नये म्हणून एक राजकारणी सौदा आपआपसात केला. तो म्हणजे 'सर्व धर्म समभाव'!! तुलना नाहीच !! सत्याचा शोध नाहीच !!

ह्याच्या, उलट 'सनातन धर्म' ह्याचा जो उल्लेख अगदी नजीकच्या काळांत श्री. अरविंद घोष यांनी केला. त्या 'सनातन धर्माची' खरी ओळख अगदी सध्याच्या सर्वसामान्य हिंदुत्ववाद्यांनाही आवश्यक वाटत नाही.

कारण, उघडपणे हेंच की 'धर्म' ही सामाजिक किंवा भौतिक भेदाची संकल्पना मानून तिचा फक्त राजकीय सत्तेच्या संदर्भातच परिचय आहे.

'धर्म' ही जन्मजन्मांतरीच्या जीवात्म्याच्या प्रवासात जीवात्म्याच्या चैतन्यशक्तीच्या गुणात्मक उन्नतीचा मार्ग व साधना आहे अशी अध्यात्मशास्त्रीय कल्पना नाही.

त्यामुळे श्री. शंकर मठ यांनी ह्या धर्माच्या बीजगुणांवर जी संस्कृतीची दर्शनी वाटचाल झाली तिचा काढलेला आलेख हा पुढील चर्चेला व अभ्यासाला उपयुक्त ठरावा !!

त्याची सखोल चर्चा आपण पुढील अंकात करूंया.
॥ हरी ॐ॥

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net

•••

# मृत्यू

*विकासाची गती, जीवनातील प्रगती सर्वकाही कुंठित करणारा मृत्यूचा अनुभव मन सुन्न करतो. या 'मरणा' बद्दल हे स्फुट चिंतन - संपादक*

मृत्यू जीवनाचे अभिन्न अंग आहे. ज्या क्षणी मनुष्याचा जन्म होतो. त्याच क्षणी मृत्यू आपली उपस्थिती लावतो; जन्माच्या दुसऱ्या क्षणीच मनुष्याचा मृत्यू होऊ शकतो. मनुष्याच्या जीवनातून मृत्यूची अनुपस्थिती होऊच शकत नाही. म्हणूनच प्रसिद्ध जर्मन तत्वज्ञानी मार्टिन हायडेगर म्हणतात की, ''मनुष्य म्हणजे मृत्यूच्या दिशेने जाणारे अस्तित्व आहे.''

मृत्यूमुळे अनेकदा मनुष्य जीवनाकडे निराशात्मक दृष्टिकोनातून पाहातो. एवढं सगळं करून शेवटी काय आपण मरून जायचं, अशा विचारांचा मनुष्य काळोखातून अंधाराकडेच प्रवास करतो. जन्माआधी मी नव्हतो व मृत्यू नंतर मी नसणार आहे. म्हणजे जीवन नव्हतेच, माझा जन्म झाला तेव्हा मला विचारले नाही व मृत्यू होईल तेव्हा मला काहीच विचारले जाणार नाही, म्हणजे जीवनाचा हेतू काय?

मनुष्य मृत्यूच्या पाशातून सुटण्यासाठी मृत्यूची वेळ टाळण्यासाठी विज्ञानाची मदत घेतो. बौद्ध धर्मग्रंथात म्हटले आहे; पाण्याबाहेरील मासा पुन्हा पाण्यात जाण्यासाठी जसा तडफडतो तशीच स्थिती माणसांची असते. मनुष्य मृत्यूच्या जबड्यातून सुटण्यासाठी तडफडत असतो.

मृत्यूची व्याख्या करणे अशक्य असले तरी हायडेगर म्हणतात '' मृत्यू अशी शक्यता आहे ज्यामुळे मनुष्याचे अस्तित्व अशक्य होऊन जाते.'' जीवनातील सर्व ध्येय पुरे करण्याचे प्रयत्न अधर्वट राहातात. मृत्यूकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहता आले पाहिजे. मृत्यूची जाणीव सतत असली पाहिजे. वाईट कृत्ये, दुष्ट विचार करताना मृत्यू डोळ्यासमोर असला पाहिजे. मृत्यू म्हणजे मनुष्यांच्या डोक्यावर नाजूक धाग्यांनी बांधलेली एक तलवार आहे. जी कधीही तुटून प्राण घेईल. राजा असो अथवा रंक प्रत्येक जण मृत्यूच्या छायेत जगतो.

मृत्यूच्या भीतीने, मृत्यूला शत्रू समजून मनुष्य त्यापासून पळत सुटतो. मृत्यूला जीवनातील शेवटची घटना समजतो, ह्या विषयावर माणूस बोलण्याचं टाळतो. मनुष्य असं जगतो, अशी कर्म करतो अशा थाटांत वावरतो की मला मृत्यू कधीच येणार नाही. ही त्याची धारणा साफ चुकीची आहे. चुकीच्या धारणेमुळे भीतीपोटी मनुष्य मृत्यूची निश्चितता लपविण्याचा प्रयत्न करतो. 'कोणत्याही क्षणी मृत्यू' ही शक्यता टाळण्याचा प्रयत्न करतो.

सकारात्मक दृष्टिकोन मृत्यूची भीती कमी करून अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन देतो. जन्म, जीवन हे जसे देवाचे दान आहे तशी 'मृत्यू' ही देखील देवाची देणगी आहे. मृत्यूची दोन वैशिष्ट्ये आहेत. मृत्यूचे प्रतिनिधीत्व कोणीच करु शकत नाही. ज्याला मृत्यू आला आहे त्यांनीच मेले पाहिजे. मृत्यू हस्तांतरीत करता येत नाही, आईच्या मांडीवर शेवटचा श्वास घेत असला तरी मृत्यूला काहीच फरक पडत नाही. कुठेही, कसाही मृत्यू येऊ शकतो. कारण शरीर मातीचे असले तरी श्वास देवाचा आहे.

---

*यज्ञ करणारा अविनाशी ठरतो.*

<u>मृत्यू असावा,</u>

१) मृत्यूमुळे दुष्ट पापी माणसं नाहीशी होतात.

२) पुण्यवान माणसाला नवीन शक्तिशाली देहांची पुन्हा संधी मिळते.

३) पुर्नजन्माला संधी.

४) मृत्यूमुळे माणसाचा अहंकार नाहीसा होतो.

५) जीवन नीरस कंटाळवाणे होत नाही.

६) काही कर्म पुढच्या जन्मी पुरी होऊ शकतात.

७) लोकसंख्या आटोक्यात राहाते.

आत्मा अमर आहे ह्याची प्रचीती येते. म्हणूनच मृत्यू सुंदर आहे.

'संदर्भ मार्टिन हायडेगर' (बिआँग ॲण्ड टाईम)

**सौ. मोनिका दिलीप कुवर**
अंबरनाथ, पूर्व.

●●●

भारतेतर कलांचा स्वीकार करताना त्यांना आपल्या प्रज्ञेत पचवून घेतले आहे. नवी प्रतिमाने, आकृतिबंध, स्वीकारूनही मूळ आशय तोच कायम राखला.

भारतीय कला अलंकरणप्रधान आणि सुशोभात्मक कला आहे.

लतावेली, कमलपुष्प, पशुपक्षी, स्त्रीपुरुष यांची मनोहर गुंफण त्यात आढळतो.

भारतीय शिल्पात सिंहकटी, नितंबिनी, घटस्तनी, दीर्घमत्स्यलोचन, सुरसुंदरी, अप्सरा, शालभंजिका, वृक्षिका इत्यादीची यौवनाने टिच्चून भरलेल्या स्त्रियांची शिल्पे विपुल प्रमाणात आढळतात.

भारतीय शिल्पकलेतील कामशिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तशी ती, इतर देशात आढळत नाहीत. खजुराहो, कोणार्क, मोधेरा, भुवनेश्वर या ठिकाणी या कामशिल्पांचे वैभवशाली विभ्रम पहायला मिळतात.

भारतातील सर्व कलांच्या निर्मितीला धर्माचे अधिष्ठान आहे. नागरी जीवनातील सर्व कलांचे प्रदर्शन करण्याची एकमेव वास्तू म्हणून मंदिर हे केंद्रस्थानी होते. कलाकार, संगीतकार, वादक, शिल्पकार, नृत्यकार, कीर्तनकार सर्वजण आपली कला, आपली विद्या ईश्वरचरणी अर्पण करण्यात धन्यता मानत असत. सर्व प्रकारचे सण - उत्सव साजरे करण्यासाठी नागरिक मंदिरात एकत्र येत असतात. मंदिर हे प्राचीन भारतीय नागरजनांच्या परस्पर संपर्काचे परस्परसंवादाचे मध्यवर्ती केंद्र होते.

# सफर - कुबेरनगरीची

*दुबईचे हे प्रवास वर्णन आहे. तेथील संस्कृती, लोकजीवन यांचे यातील अनुभव वाचनीय आहेत. - संपादक*

सोन्याची फार मोठी बाजारपेठ असलेलें शहर म्हणून दुबईनगरीचें नांव. आम्हांला ज्ञात होते. त्यामुळें केसरीच्या युरोपच्या सहलीसमवेत दुबईला जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे हें कळतांच आम्ही त्याच सहलीचा पर्याय स्वीकारला आणि युरोपची सहल आटोपून मिलान-दुबई फ्लाईटनें सकाळींच दुबईला उतरलों.

दुबईचा विमानतळ अत्यंत प्रशस्त व अद्ययावत आहे. उतरल्या बरोबरच आपण एका संपन्न देशांत आलों असल्याची खात्री होते. पायऱ्या चढण्यासाठीं तर इलव्हेटर आहेतच पण सपाटीवर चालण्यासाठींहीं येथें सरकत्या पट्ट्याची सोय आहे.

येथें आमचा मुक्काम 'अँडमिरल प्लाझा' ह्या हॉटेलमध्यें होता. तेथें नाश्ता घेऊन ९॥ वाजतां स्थल दर्शनासाठीं आम्ही बाहेर पडलों आमचा ग्रुप २६ जणांचा होता. दुबई शहर अत्यंत सुंदर प्लानिंग करून उभें करण्यांत आलें आहे.येथें युरोपसारखी हिरवाई नाही. मोठमोठीं झाडे कमीच पण रस्त्याच्या दुतर्फा व मध्यभागी हिरवळी व फुलझाडांचे सुंदर सुंदर वाफे बजविले आहेत. खजुराचीं झाडे दिसतात. समुद्राचें पाणी अत्यंत स्वच्छ आहे. मोठमोठ्या बोटींमधून आयात-निर्यात चालते. मोटारीही बोटींमधून आयात होतात. येथील कस्टम्स ऑफिसची इमारत बोटीच्या आकाराची बांधली आहे. अत्यंत समृद्ध असें हे शहर आहे. टोलेजंग अशा नव्या अनेक मजली इमारती बांधल्या जात आहेत. अमेरिकेंतील द्विन टॉवर्स, उध्वस्त झाल्यानंतर जगांतील सर्वात उंच इमारत सध्यां मलेशियांत आहे. परंतु त्याच्या दुपट्ट मोठी इमारत येथें बांधली जात आहे. अशी माहिती आमच्या गाईडने पुरविली. येथें राजाची राजवट आहे. अनेक ठिकाणीं त्याचे राजवाडे आहेत. सध्या तो रहात असलेल्या राजवाड्याच्या आवारात उत्तम रस्ते, हिरवळी, झाडें व अनेक मोर आहेत. भारताचा हा राष्ट्रीय पक्षी तेथें अत्यंत दिमाखांत रहात आहे. एक पांढरा मोरही दिसला.

येथें पिण्यासाठीं नैसर्गिक गोडें पाणी उपलब्ध नाहीं. पाऊस नांवालाच पडतो. पण राजकीय इच्छाशक्ती असली की माणूस त्याच्या भूमीचा कायापालट कसा करु शकतो ह्याचें मूर्तिमंत उदाहरण येथें पहावयास मिळते. प्रदेश वाळवंटी आणि पाण्याचें दुर्भिक्ष्य असूनही येथें येथें सुंदर हिरवळी व फुलझाडांचे ताडवे फुलविले आहेत. उन्हाळा एवढा कीं ह्या झाडांना दररोज तीन तीन वेळां पाणी द्यावें लागतें. पण त्या कामीं सांडपाण्याचा उपयोग करून अरबांनी येथें नंदनवनाचीच निर्मिती केली आहे. दर तीन-चार महिन्यांनीं नवीं फुलझाडें लावलीं जातात. अरबी समुद्राचें पाणी वाफ करून शुद्ध करून घेऊन पिण्याच्या कामासाठीं वापरले जातें.

येथील एकूण लोकसंख्येच्या फक्त २०% लोक स्थानिक मुस्लीम असून उरलेले ८०% लोक परदेशी आहेत. आमचा स्थानिक गाईड सांगत होता कीं दुबईमध्यें एकूण १५० हॉटेल्स व ५० शॉपिंग मॉल्स आहेत. दुबई व बरदुबईचें (स्थानिक उच्चार दुबाय व बरदुबाय) क्षेत्रफळ सध्यां ३६००स्क्वेअर मीटर्स आहे आणि समुद्रांत भराव टाकून नवीन नवीन जमिनी तयार केल्या जात आहेत. कोणाही परदेशीयाला येथे जमीन विकत घेतां येत नाहीं परंतु येथील भरभराट ह्या बाहेरून आलेल्या लोकांमुळेंच झालेली आहे.

दुबई, कतार, अजमान, अबुधाबी, शारजा, कुवैत व ओमान अशा सातांची मिळून अरब अमिरात बनली आहे. सन १९७१ पर्यंत ह्या सातही जणांना वेगळें अस्तित्व होतें परंतु १९७१ मध्यें संयुक्त अरब अमिरात (U.A.E.) निर्माण झाली. (U.A.E.) ला ७०० कि.मी.चा किनारा लाभला आहे. पाम आयलंड ह्या नव्या संकल्पित बेटामुळे आणखी किनारा मिळेल. ह्या बेटाच्या निर्मितीकरीतां अंदाजित खर्चाचा आकडा ३०० मिलीयन डॉलर्स इतका आहे. १ कि.मी. उंचीचे एक 7 Star delux हॉटेल ह्या मनुष्य निर्मित बेटावर व्हावयाचें आहे. येथें प्रतिदिन १२०० डॉलर्स ह्या दरानें खोल्या उपलब्ध असतील. अबुधाबीमध्येंही एक असेंच हॉटेल उभें रहात आहे.

दुबई ही टॅक्स फ्री लॅण्ड आहे. येथें विक्रीकर, प्राप्तिकर इ. कर भरावे लागत नाहीत. परिणामतः येथें येणारे पर्यटक मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. येथें वापरात येणाऱ्या ह्या मुबलक परदेशी चलनामुळें येथें डुप्लिकेट करन्सी वापरणें, खोटे चेक वटविणें इ. प्रकार करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणांत होतो. त्यामुळे ट्रॅव्हलर्स चेकच्या स्वरूपांत तेथें नेलेले युरो हें चलन दिराममध्यें परिवर्तित करण्यास आम्हांला बराच त्रास झाला, सकाळीं २-३ तास व सुमारें ४०० रूपये खर्च झाले.

जुमेरिया ही येथील सर्वांत महागडी वस्तीची जागा. आपल्या मुबईतील पेडररोड सारखी. युनायटेड अरब अमिरातींत नागरिकत्वा बाबतचे नियम अत्यंत कडक आहेत. स्थानिक मुस्लिमांना सर्वत्र झुकतें माप मिळतें. त्यांच्यापैकींच नवरा मुलगा व नवरीमुलगी असेल व तें त्यांचें पहिलेंच लग्न असेल तर त्यांना सरकारतर्फे भेट म्हणून रहावयास जागा व वीस हजार डॉलर्स मिळतात. मुस्लिम माणूस त्याच्या धर्मानुसार चार लग्नें करूं शकतो. मात्र त्याला त्याच्या पहिल्या बायकोची संमति घ्यावी लागते.

त्या दुपारी आमच्यासाठीं वाळवंटातील सफरीचें आयोजन करण्यांत आलेलें होतें. येथें कॅमलराइड व कारराइड होती. कांहींनीं उंटाच्या पाठीवर बसून वाळवंटांत फेरफटका मारला तर काहींनीं कार राइड घेतली. एका कारमध्यें ६ जण बसतात. कार वेगानें वाळूच्या डोंगरावरून वर खालीं अशी धावूं लागली कीं आतील सर्वांना जोरदार हादरे बसतात. सर्वांना ही राइड खेप आवडली पण आम्ही उभयतां व आमच्या ग्रुपमधील घाटेकाका आम्ही तिघांनीं त्यापासून दूर रहाणें पसंत केलें कारण पाठीचें व कमरेचे दुखणें ज्यांना मणक्याचा काही त्रास असेल त्यांनी ह्या राइडस्‌ना न गेलेलें बरें असा सल्ला आम्हांला मिळाला होता हें एक आणि राजस्थान टूरवर आम्ही उंटावरून हिंडण्याचा अनुभव आधींच घेतला होता हें दुसरें. आम्ही राइड घेणार नाहीं म्हणून संयोजकांनीं आम्हांला एकदम तेथील बेस कॅम्पवर पोहोंचविले. अर्थांत तेथपर्यंत पोहोंचेपर्यंत कार राइडची थोडीशी झालक मिळलीचं.

ह्या बेसकॅम्पवरचे ते ४ तास हा एक आगळावेगळा जीवनानुभव होता. तीन मोठाले तंबू बनविले होते. बाजूनें कनाती लावून कांही स्टॉल्स उभे करून संपूर्ण गोलकार असा हा कॅम्प बनला होता. मध्यभागीं सुमारें ३ फूट उंचीचे स्टेज बनवून त्यावर गालिचे अंथरले होते. त्याच्या सर्व बाजूंनी सहा-सहा माणसें बसूं शकतील अशीं सुमारे ३५ टेबलें लावलीं होतीं. तींही ३ फूट उंचीचा होतीं. त्या प्रत्येक टेबलाभोंवतीं जाडजूड तक्के ठेवून सहा सहा माणसांची बसण्याची सोय केलेली होती. स्टेजवरही चारी बाजूंना असे तक्के ठेवले होते तसेंच तंबूंमध्येही बसण्याची अशीच व्यवस्था होती. खाली तक्क्यांवर बसूं न शकणाऱ्यांसाठीं कांहीं खुर्च्याही मांडलेल्या होत्या.

तेथें गेल्याबरोबर आम्हांला थंडगार पाण्याचे पॅकबंद ग्लास दिले गेले. चहा, कॉफी, थंड पेय अशी सर्व सरबराई झाली. पाश्चात्य पद्धतीच्या टॉयलेटस्‌चीही सोय तेथें करण्यांत आली होती. मोठेमोठे फ्लड लाइटस्, साउंड

सिस्टीम लावून मैफलीची जय्यत तयारी करण्यांत आली होती. एका वैराण वाळवंटी प्रदेशांत हा सारा सरंजाम पाहून आम्ही तर चकितच झालों. आसमंतांत एकही घर काय झोपडेंही दिसत नव्हतें. तेथील स्थानिक नोकरलोकां खेरीज आम्ही फक्त तिघेच सुमारे दीड तासानें राइडसूना गेलेले लोक परतले. आणखीही इतर प्रवासी ग्रुप्स आलें. सर्वजण राइडसूवर खुष होते. आमच्यांतील तरूण तुर्कांनीं तेथें नृत्य ही केले होतें. एकूण सर्व माहोल मौजमजेचा असा होता. भारतीय, चिनी, जपानी, कोरियन, युरोपिअन, अमेरिकन इत्यादी विविध देशांमधली आम्हीं दोन अडीचशे माणसे तेथें जमलों होतों. व्हेज आणि नॉनव्हेज अशा दोन्ही प्रकारचे जेवण तेथें उपलब्ध होतें. जेवणानंतर फ्लड लाइडस् लागले. साऊंड सिस्डीम सुरुं झाली व एक गौरांगना रेकॉर्ड डान्स करुं लागली. आमच्यापैकीं काहींना तिनें त्या नृत्यांत सामील करून घेतले. काहींनी एका तंबूत जाऊन तेथील फोटोग्राफरकडून आपले अरबी वेषामधील फोटो काढून घेतले. काहीं स्त्रियांनीं आपले हात मेदीं लावून घेऊन सुशोभित केले. माणसें वाळूच्या टेकाडावरून घसरत होतीं, पडत होतीं. ''आनंदी आनंदे गडे, जिकडे तिकडे चौहीकडे'' असा हा माहोल होता. अत्यंत मनोरंजक व आनंददायी असा हा अनुभव होता पण मानवी मनाची गंमत पहा. अशा अत्यंत आनंदाच्या प्रसंगीं त्याला अनामिक हुरहुर लागते. अगदीं हाच अनुभव येथें आला. मनांत आलें. आज जेष्ठ नागरिक झाल्यानंतर आपण येथें आलों आहों. ह्यांचें वय ६८ तर माझे ६२. आपण जर थोडें आधी येथें आलों असतों तर ही सर्व मौज अधिक उपभोगूं शकलों असतों. कदाचित वाळूच्या डोंगरावरून घसरलों असतों, युरोपांत बर्फावर गेलों तेव्हां खेळलों असतों, स्केटिंग केलें असतें इ. अर्थांत वयोमानानुसार येणारें समतोल विचाराचें भाग सोबतला होतेंच. त्यामुळें हें सर्व पाहून मिळणारा आनंद उपभोगण्याच्या वयांत तरी येथें येऊं शकलों हेंही काय कमी आहे असा विचाराचें भान सोबतीला होतेंच. त्यामुळें हेंही काय कमी आहे असा विचार करून इतपत आर्थिक व शारीरिक क्षमता देवानें दिल्याबद्दल त्याचे मनापासून आभार मानले व रात्रीं ९ वाजतां सर्वांबरोबर हॉटेल ॲडमिरल प्लाझावर परतलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दुबईच्या गोल्ड मार्केटमध्यें जायचे होते. आम्ही चौघा चौघांच्या ग्रुपनें बाहेर पडलों. हॉटेलबाहेर पडून आम्ही जवळच्या मुख्य रस्त्यावर पोहोंचलों. कितीतरी टॅक्सीजना हात करूनही टॅक्सी आमच्या साठी थांबेना. फारशीं टिप न देणारीं गिऱ्हाइकें त्यांना पटकन ओळखून येत असावी. कंटाळून आम्ही परत फिरण्याच्या बेतांत होतों तोंच रस्त्याच्या पलिकडील बाजूला उभ्या असणाऱ्या एका टेम्पोच्या चालकानें आम्हांला हिंदींत विचारलें 'कहाँ जाना है?' आमच्या आपसांतीला संभाषणामुळें त्यानें आमचे भारतीयत्व ओळखलें होतें. तों स्वतः अंधेरीतील संभाषणामुळे त्यानें आमचें भारतीयत्व ओळखलें होतें. तों स्वतः अंधेरीतील चकाला येथील रहिवासी होता. त्यानें मग आम्हाला गोल्डसुख मार्केटला सोडलें. ही खरोखर कुबेरनगरीच होती. सगळ्या दुकानांच्या शोकेसेत सोन्याच्या चमचमणाऱ्या दागिन्यांनीं शोभत होत्या. आम्हीही थोडीबहुत खरेदी केली. हल्लींच्या जागतिकीकरणाच्या रेट्यामुळें सोन्याच्या भावांत मुंबईच्या तुननेंत कांहीही फरक नव्हता पण दुबईसफरीची आठवण म्हणून दोन्ही नातींना छोटे छोटे मीनाकारी केलेले टॉप्स घेतले.

दुपारचें जेवण घेतल्यानंतर आम्ही ॲडमिरल प्लाझावरील आमच्या रूममधून चेकआऊट करून सामान हॉटेलच्या स्टोअररूमवर टाकलें आम्ही आमची बस शारजादर्शनासाठीं निघाली.

शारजाशहरही चांगलें आखीव शहर आहे. गंमत म्हणजे दुबई किंवा शारजा येथेंही बुरखाधारी स्त्रिया दिसल्याच नाहींत. पाकिस्तानी, चिनी, भारतीय, बांगलादेशी हीच मंडळी जास्त. शारजा येथील कल्चरल

प्लेस चौकामध्यें एक विशेष गोष्ट पहावयास मिळाली. मी स्वतः ग्रंथपालन क्षेत्रांतील एक व्यावसायिक. कदाचित त्यामुळेंच ही गोष्ट विशेष वाटली. ह्या चौकांत एका उंच खांबावर, 'कुराणाचे ' उघडलेलें पुस्तक असें शिल्प आहे. ह्या उघड्या पुस्तकामुळें हा चौक विशेष लक्षांत राहिला. त्यांचे विशेषत्व मनावर ठसण्यामागें आणखीही एक ऐतिहासिक अशी पार्श्वभूमी आहे. कागदाचा शोध लागला चीनमध्यें पण त्याचा युरोपभर प्रवेश झाला तो अरबांमार्फत, प्रिटिंगचा शोध युरोपांत लागलां ज्ञानाच्या ह्या प्रसारमाध्यमाचा ही प्रसार झाला तो अरबांच्याच मार्फत. त्यांनींच पुस्तकाचे हें असें शिल्प सत्कार करावें हें उचितच होय.

**सौ. सुनीता जयंत खरे**

५४, मेघदूत 'बी' सोसायटी,
शहाजीराजे रोड, कोलडोंगरी,
अंधेरी (पूर्व ), मुंबई ४०० ०६९.
दूरध्वनी : २६८२६६९४
भ्रमणीध्वनी : ९९२०७ १०५९०

●●●

कौटिल्याने शहरातील राजांचे व श्रेष्ठींचे महाल, देवतांच्या मूर्ती व मंदिरे यांची स्थाने कुठे कशी असावीत याचा ऊहापोह केला आहे. त्यावेळी या वास्तू लाकडाच्या जास्त असत. लाकडावरच कोरीव मूर्ती असत. पाषाणाचा वापरही अर्थात होई. सांची - बारहुत स्तुपामध्ये पाषाण व विट यांचा वापर झालेला दिसतो.

तेराव्या शतकात मुस्लीम आक्रमणानंतर मंदिर बांधणीक्रिया उत्तर भारतात मंदावली, ती दक्षिण भारताकडे अठराव्या शतकापर्यंत चालू राहिली. मंदिरांना कैलासशिल्प अथवा मेरूशिल्प असेही म्हणतात.

## *देश - जुनी - नवी नावे*

| पूर्वीचे नाव | बदललेले नाव |
|---|---|
| १) बास्चुआनालँड | लेसोथो |
| २) ब्रिटिश गियाना | गुयाना |
| ३) झैरे | कांगो |
| ४) फोर्मोसा | तैवान |
| ५) मेसोपोटेमिया | इराक |
| ६) उत्तर ऱ्होडेशिया | झांबिया |
| ७) न्यासालँड | मालावी |
| ८) सयान | थायलंड |
| ९) नैर्ऋत्य आफ्रिका | नामीबिया |
| १०) आयलँड | इरे |
| ११) सिलोन | श्रीलंका |
| १२) डच गियाना | सुरीनाम |
| १३) गोल्ड कोस्ट | घाना |
| १४) जपान | निप्पोन |
| १५) मादागास्कर | मलागासी |
| १६) उत्तर बोर्निओ | सावाह |
| १७) पर्शिया | इराण |
| १८) तांगनिका | तान्झानिया |
| १९) ऱ्होडेशिया | झिंबाब्वे |
| २०) ॲबिसिनिया | इथोपिया |
| २१) हॉलंड | नेदरलँड |
| २२) ब्रह्मदेश | म्यानमार |
| २३) कंबोडिया | कम्पुचिया |

# परिसरवार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा : प्राथमिक विभाग

- सी.के. पी. सोशल क्लब तर्फे आयोजित राज्यस्तरीय पोहोण्याच्या स्पर्धेत कु. श्रेयस पेंडसे - इ. ४ थी यास प्रथम पारितोषिक व कु. प्रज्ञा तेंडुलकर - इ. २ री हिला तृतीय पारितोषिक मिळाले.
- महाराष्ट्र राज्य खुल्या कराटे स्पर्धेत कु. सोहम जाधव - इ. ३ री यास रौप्य पदक मिळाले.
- आयडिल स्पोर्टस असोसिएशन तर्फे आयोजित इंटरस्कूल रोलर स्केटिंग चॅम्पियनशीप मध्ये कु. दिप बौआ - इ. ४ थी यास सुवर्ण पदक मिळाले.
- 'इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ स्वीमींग क्लब' तर्फे घेण्यात आलेल्या पोहोण्याच्या स्पर्धेत इ. ३ री च्या वैष्णवी देसाई हिस जिल्हास्तरीय पातळीवर पारितोषिक मिळाले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा : माध्यमिक विभाग

- **एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २००७ - २००८ :**

| एलिमेंटरी श्रेणी परीक्षा | इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा |
|---|---|
| एकूण विद्यार्थी - ४८ | एकूण विद्यार्थी - २१ |
| उत्तीर्ण विद्यार्थी - ४३ | उत्तीर्ण विद्यार्थी - २० |
| अ श्रेणी - ०० | अ श्रेणी - ०२ |
| ब श्रेणी - ०७ | ब श्रेणी - ०५ |

- **ठाणे जिल्हा गणित प्रज्ञा परीक्षा २००८ :**

गणित प्रज्ञा परीक्षेतील प्रशस्तिपत्रकाचे मानकरी खालील विद्यार्थी -

| | | |
|---|---|---|
| १. ओम बापट | : | इ. ५ वी |
| २. ऋत्विक छेडा | : | इ. ५ वी |
| ३. परिता दानोले | : | इ. ५ वी |
| ४. ईशा सामंत | : | इ. ५ वी |
| ५. सन्मय अगारकर | : | इ. ५ वी |
| ६. आभा मुतालिक | : | इ. ५ वी |
| ७. कुणाल चौधरी | : | इ. ८ वी |

## वा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

- **पारितोषिक वितरण व संयुजा प्रकाशन अहवाल :**

दिनांक १७ जानेवारी रोजी महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक समारंभ व 'संयुजा' या वार्षिकाचे प्रकाशन असा कार्यक्रम थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित केला होता.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय सोनार उपस्थित होते. डॉ. संजय सोनार हे मॉलिक्युलर बायोलॉजी ह्या विषयाचे गाढे अभ्यासक मानले जातात.

स्वागतगीत, पाहुण्यांचे स्वागत, पाहुण्यांचा परिचय वगैरे औपचारिकता पूर्ण झाल्यावर प्रथम डॉ. सोनार यांनी 'संयुजा' चे प्रकाशन केले. नियतकालिक समितीच्या सौ. उषा बाळ यांनी नियतकालिकाबद्दलचे मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयाचा

अहवाल सादर केला. विविध समित्यांनी आपले वार्षिक उपक्रम अहवालरूपाने सादर केले.

डॉ. सोनार यांनी मॉलिक्यूलर बायोलॉजी या विषयाची माहिती आपल्या भाषणात दिली. सामान्य जनांना समजेल अशा भाषेत पारदर्शिकांच्या आधारे त्यांना विषय समजावून दिला व या क्षेत्रात चालू असलेल्या संशोधनाच्या भावी वाटचालीचाही आढावा घेतला.

मा. डॉ. सोनार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

वृत्तांत लेखन - **कादंबरी कादरेकर**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, मा. वि.

✦ उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा (H.S.C.) व माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) मार्च' ०८ याचे उपकेंद्र संचालक म्हणून अनुक्रमे सौ. सुनिता देशपांडे (उपमुख्याध्यापिका) व श्री. ज. रा. गवई (पर्यवेक्षक) यांनी आपली जबाबदारी यशस्विरित्या पार पाडली.

✦ 'सकाळ' वृत्तपत्र आयोजित 'संस्कार शिदोरी' या अभिनव स्पर्धेत शाळेतील आदित्य निखाडे (५ अ), शुभम् पवार (५ ब), सुनिल बोटे (७ ड), प्राजक्ता साळुंखे (१० क) यांना उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रक व उत्तम दप्तर असे पारितोषिक प्राप्त झाले.

✦ शिक्षण प्रसारक मंडळाचे रामनारायण रूईया कॉलेजातर्फे ''विश्वास २००८'' ह्या तीन दिवसीय कृतिसत्रात ८ वी चे प्रज्ञेश सरवणकर व प्रफुल्ल खेडेकर सहभागी होणार आहेत. सदर कृतिसत्र २३ ते २५ एप्रिल या कालावधीत संपन्न होणार आहे.

✦ २७ मार्च रोजी भगवती विद्यालय येथे शाळेत वर्षभर राबविण्यात आलेल्या 'वाचन संस्कृती विकास प्रकल्प २००७ - ०८' चा समारोप कार्यक्रम संपन्न झाला. सदर एकदिवसीय कार्यशाळेत श्री. अशोक टिळक यांच्या प्रास्ताविकानंतर सौ. नंदिनी बर्वे, श्री. पद्माकर शिरवाडकर, श्री. हेमंत मोने आदी मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली गेली. कार्यशाळेस प्रकल्प मार्गदर्शक शिक्षिका सौ. साधना कारंडे-जोशी उप. सौ. सुनिता देशपांडे उपस्थित होत्या.

✦ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) नवी दिल्ली, यांचे तर्फे मध्यावधी संपादणूक सर्वेक्षणासाठी ठाणे जिल्ह्यातून शाळेची व इ. ७ ब च्या १५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

✦ सौ. सुचिता नलावडे प्राध्यापिका, सोमय्या कॉलेज यांनी मराठी अभ्यास केंद्र यातर्फे विविध उपक्रमांमध्ये मराठी माध्यमाच्या शाळांच्या प्रश्नांना महत्त्वाचे स्थान दिले या संदर्भात आयोजित उपक्रमात दिलेल्या प्रश्नावलीत शाळेतील ७ शिक्षक व ७ विद्यार्थी सहभागी झाले.

✦ दि. १८ नोव्हेंबर २००७ रोजी झालेल्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (राज्यस्तर) इ. १० वी साठीच्या परीक्षेत या मिळवून राष्ट्रीय स्तर परीक्षेसाठी कु. प्रफुल्ल पांडुरंग खेडेकर (८ अ), कु. प्रणव प्रभाकर फिरके (१० अ) यांची निवड झाली असून NCERT नवी दिल्ली यांच्या वतीने N.T.S. राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या लेखी परीक्षेसाठी प्रफुल्ल व प्रणवची निवड झाली आहे.

## सौ. आनंदीबाई जोशी

✦ **रामायण परीक्षा २००७ - २००८ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी २६

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी २०

| विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| २ | ७ | ३ | ८ |

विशेष प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे :

१) तुषार प्रसादे    २) श्रेया जोशी

१०० % निकाल

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी : ०६

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी : ०६

| क्र. | इ. | नाव | अखिल भारतीय क्रमांक | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | ५वी | ऋतुजा धनावडे | २७१९ | अति उत्तम |
| २ | ७वी | पुष्कर ओक | १०५१ | उत्तम |
| ३ | ७वी | प्रणव सहस्रबुद्धे | ८३०६ | साधारण |
| ४ | ७वी | साहिल नातु | ५३० | अति उत्तम |
| ५ | ७वी | जेई धवन | १६१५५ | साधारण |
| ६ | ८वी | धवल शाखला | ३८१५ | चांगला |

✦ Science Foundation **परीक्षा २००७-२००८:**

१००% निकाल

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी ०३

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ०२

अनुपस्थित विद्यार्थी ०१

✦ **गणित पारंगत परीक्षा २००७-२००८:**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी ०५

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ०४

१) कु. ओजस गोहाड - ठाणे जिल्हात प्रथम क्रमांक

२) कु. मालविका मुळे - प्रमाणपत्र विजेती

३) कु. वृतिका शाह - प्रमाणपत्र विजेती

## विधी महाविद्यालय

✦ दि. ११ मार्च २००८ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे महानगरपालिका विधि महाविद्यालयात अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. सांगळे यांच्या हस्ते कायदा सहाय्यता कक्षाचे उद्घाटन झाले. ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे अधिक्षक श्री. चव्हाण कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

✦ कायदा साक्षरता कार्यक्रम व कारागृहातील कैद्यांना कायदा सहाय्यता देण्यासाठी कारागृहात भेट देणे हे या कक्षासमोरचे प्रथम उद्दिष्ट आहे.

✦ विधि महाविद्यालयातील व्याख्या त्या सौ. रश्मी आचार्य या कक्षाच्या प्रमुख आहेत.






✦ यापूर्वी ३ फेब्रु. २००८ रोजी वसई तालुक्यातील भाताणे गावात वसई तालुका कायदासेवा प्राधिकरण आयोजित कायदा साक्षरता शिबिरात काही विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.

✦ २१ मार्च २००८ रोजी विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीने महाविद्यालयाच्या प्राचार्या व काही प्राध्यापकांसमवेत ठाणे मध्यवर्ती कारागृहाला भेट दिली.

✦ या योजने अंतर्गत संपूर्ण कारागृहाचा ४४ हेक्टरचा परिसर आणि कारागृहातील कैद्याची प्रत्यक्ष भेट, तसेच त्यांच्यासाठी असलेले स्वयंपाकघर, बेकरी आणि त्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तू पाहणे हा सगळा अनुभव शब्दात मांडता न येण्यासारखा आहे.

✦ टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स अंतर्गत काम करणाचा 'प्रयास' या सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी देखील त्यावेळी उपस्थित होते. त्यांनी कारागृहातील कैद्यांच्या भेटी दरम्यान त्यांना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

✦ **Sewage Plant ला दिलेली भेट (त्यासंबधीत अहवाल) :**

टी. एम. सी. (TMC College) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पवार नगर, वसंतविहार इथे असलेल्या हिरानंदानी सिव्हेज प्लान्ट (Hiranandani's sewage plant) ला भेट दिली. ४ मार्च २००८ या दिवशी या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली होती. या सर्व पाहाणीत तेथील sewage plant मधील वरिष्ठ अभियंता (Senior Engineers) आणि प्रकल्प पर्यवेक्षक (Project Supervisor) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले व Sewage Plant च्या सर्व प्रक्रियांबाबत सविस्तर माहिती पुरवठा केला.

**प्रकल्पाबाबत माहिती :**

तेथील पाहणी करताना प्रथमत: वरिष्ठ अभियंता यांनी Sewage Plant च्या व्यवस्थेबद्दल माहिती दिली.



पहिली टाकी ही महत्त्वाची टाकी असून त्यामध्ये प्रत्येक टाकीतून होणाऱ्या सांडपाण्याची साठवणूक करण्यात येत होती. पण या महत्त्वाच्या टाकीची व्यवस्था भूमीगत होती. १० मीटर अंतरावर २ दंडगोल आकाराच्या आणि शंकूच्या आकारासारखी १ टाकी अशी व्यवस्था करण्यात आली होती. त्यातल्या एका टाकीत दाब प्रक्रिया करण्यात येत होती. त्यामध्ये चिखलगाळ, सांडपाणी याची विभागणी करण्यात येत असे. यातून तयार होणारे मिश्रण पहिल्या टाकीत जाण्याची व्यवस्था होती आणि नंतर उरलेला उर्वरीत / शेष भाग इतर टाक्यांमध्ये जमा केला जात होता.

या सर्व प्रक्रियेनंतर शंकूसारख्या टाकीमध्ये पाण्यावर प्रक्रिया करून त्याचे शुद्धीकरण (Purification) केले जात होते. या पाण्याचा वापर मुख्यत्वे करून बागायतीकरण किंवा मोटार या सर्व गोष्टी धुण्यासाठी मोठ्याप्रमाणावर करण्यात येतो.

**आभार प्रदर्शन :**

४ एप्रिल २००८ या रोजी झालेल्या Sewage Plant पाहाणीत ठाणे महानगरपालीकेचे अभियंता, पर्यवेक्षक यांची विशेष मदत मिळाली. त्यांनी विद्यार्थ्यांचे सर्व शंकानिरसन करून सांडपाण्याची उत्तम व्यवस्था आणखी कशाप्रकारे करता येऊ शकते. याविषयी देखील माहिती प्रदान केली.

TMC महाविद्यालयातील सौ. प्रज्ञा राजेबहादूर, वाघ मॅडम, सौ. नवरे मॅडम यांचा विशेष सहभाग होता. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व अभियंता व अधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांचा देखील उत्तम सहभाग होता.

## वि.प्र. मं. तंत्रनिकेतन

### ✦ वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे पहारेकरी श्रीयुत जे. एम. रावथर सेवानिवृत्त :



**जे. एम. रावथर**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन चे पहारेकरी श्री. जे. एम. रावथर हे पहारेकरी म्हणून १ ऑगस्ट १९८८ पासून सेवेत रूजू होते. ते दिनांक ३१/३/२००८ रोजी आपल्या दिर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. प्राचार्य दि. कृ. नायक याचे हस्ते श्री. जे. एम. रावथर यांचा तंत्रनिकेतन तर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. अशासकीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना - तंत्रनिकेतन युनिट तर्फे श्री. जे. एम. रावथर यांना प्राचार्य दि. कृ. नायक यांचे हस्ते भेटवस्तू व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी प्राचार्य दि. कृ. नायक यांनी श्री. जे. एम. रावथर विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

### ✦ विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या नुतनीकृत ग्रंथालय आणि माहिती केंद्राचे उद्‌घाटन :

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या नुतनीकृत ग्रंथालय आणि माहिती केंद्राचे उद्‌घाटन दि. ३ एप्रिल २००८ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे शुभहस्ते सकाळी ठिक ९.०० वाजता, बिल्डींग रुम नं. २, पहिला माळा, पॉलिटेक्नीक ग्रंथालय या ठिकाणी फीत कापून करण्यात आले. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्रमुख मान्यवर, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, महाविद्यालय परिसरातील सर्व प्राचार्य, महाविद्यालय परिसरातील सर्व ग्रंथपाल, विभाग प्रमुख, तंत्रनिकेतन मधील स्टाफ, विद्यार्थी इत्यादी हजर होते. मान्यवरांचे हस्ते सरस्वतीला हार घालून द्विपप्रज्ज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात ईशस्तवनाने झाली. स्वागतपर भाषण प्राचार्य दि. कृ. नायक यांनी केले. त्यानी तंत्रनिकेतनच्या प्रगतीचा आढावा आपल्या भाषणात मांडला. प्रमुख पाहुणे डॉ. विजय बेडेकर यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. आभार प्रदर्शन तंत्रनिकेतनच्या ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रा. सौ. के. एस. आगाशे यांनी केले. कु. ऋचा आगाशे या विद्यार्थीनीने गायलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

तंत्रनिकेतनचे २००७ - २००८ हे रौप्य महोत्सवी वर्ष असून या वर्षात नुतनीकृत ग्रंथालय आणि माहिती केंद्रात माहिती तंत्रज्ञानाच्या सोयी सुविधा, वातानुकुलिकरण इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचा विद्यार्थ्यांना चांगलाच फायदा होणार आहे.

●●●

मुखपृष्ठावरून

**क्रियेवीण वाचाळ माणसे**

माणूस वा पैसा गेलेला काळ विकत घेऊ शकत नाही. हे लक्षात येत असेल तर आज पायावर दगड मारून घेण्यापेक्षा क्रियाप्रवृत्त झाला तर देश फार पुढे जाईल.

थोडक्यात, समाजकारण असो, पर्यावरण असो की शिक्षण क्रियेवीण वाचळता हे आजच्या आपल्या जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण बनत आहे. कोणीही कृती करायला धजत नाही, आणि धजलाच तर त्याची कृती भ्रष्टाचाराची जनक बनते किंवा ती तशीच बनेल याची काळजी घेतली जाते. अशा खोट्या भ्रष्टाचाराला, त्याच्या खोट्या प्रकाराला नाहक बळी पडणाऱ्या संस्था, माणसे पावलोपावली भेटतात.

यासाठीच आजच्या समाजकारणाच्या आणि इतर क्षेत्रांच्याही सर्व दिशा, त्यांचे सर्व कोन बारकाईने तपासायला हव्येत. पर्यावरणाबद्दल इतके बोलले जाताना दिसते पण  राजरोसपणे. पैशाची ताकद वापरून जमिनी 'बिगर शेती' असल्याचे दाखवले जाते, काही शे वर्षे जुनी झाडे तोडली जातात आणि ''कार्यवाही करण्यात येणार असल्याचे ---'' संबंधित फक्त बोलत राहतात. नुसतेच कागदी घोडे नाचवणे की प्रशासन चालले असे समजणारे लोक सत्तेवर बसतात. शुभचिंतनाला मग भिंतीवर टांगल्या जाणाऱ्या मृतप्राय सुविचारांचे स्वरूप प्राप्त होते. कोणत्याही शासकीय कार्यालयाच्या भिंती सुशोभित करण्यासाठी हे सुविचार वापरले जातात. कागदी घोड्यांच्या शर्यतीची अशी मैदाने महत्त्वाची की देशाच्या विकासातील गती ?

दक्षिणेकडील एका शाळेत आग लागल्याची, व त्यात अनेक छोटी मुले आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची घटना व त्या घटनेच्या बातम्या आम्हाला आठवतात. या दुर्घटनेनंतर महाराष्ट्रात सर्व शिक्षण संस्थांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसवण्यात येणार असल्याचे संबंधित खात्यांकडून सांगितले गेले. प्रत्यक्षात केवळ कागदी घोडे नाचवले गेले. निविदा मागवल्या जातात. रकमा मंजूर होतात पण शिक्षण संस्थांच्या क्षितिजावर सुधारणांचे सूर्य उगवतच नाहीत. हे एक उदाहरण आहे. शिक्षण ही शासनाची जबाबदारी असेल तर आगप्रतिबंधक यंत्रणा दूरच, किमान प्राथमिक सोयींची उपलब्धता तरी हवी---! बोलले जाणे आणि कृती होणे यात प्रचंड अंतर आहे.

आजचा सूर्य मावळला की वर्तमानपत्रांची रद्दी होते. त्या रद्दीतच सर्व वक्तव्ये विरून जातात. राष्ट्र चालायचे तर दोषारोप करून, बोटे दाखवून ते चालत नाही. त्यासाठी सर्व इच्छा शक्तीनिशी काम करणारी माणसे लागतात. ही माणसे शंभर टक्के समर्पित आणि नि:स्वार्थी असावी लागतात हे नव्याने सांगण्याची गरज आहे असे नाही. अशी माणसे हे अजूनही स्वप्नच असावे हा दैव दुर्विलास आहे. स्वातंत्र्य याचा अर्थ जबाबदारी असा असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढीला तो माहित होता. ती पिढी अमरपट्टा घेऊन आलेली नव्हती; तशी कोणतीच पिढी नसते. पण आज ती पिढी असती तर स्वातंत्र्याचा अर्थ माहित असणारी काम करणारी माणसे दिसली असती. बोटावर मोजले जाणारे अपवाद, हे अपवादच असतात. त्यामुळे क्रियेवीण वाचाळता टाळायची असेल तर आपण जागे व्हायला हवे आहे !

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## • विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. बेडेकर विद्या मंदिर | (मराठी माध्यम) |
| २) | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय | (इंग्रजी) |
| ५) | बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय | |
| ६) | के. ग. जोशी कला महाविद्यालय | |
| ७) | ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय | |
| ८) | वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय | |
| ९) | वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन | |
| १०) | प्रगत अभ्यास केंद्र | |
| ११) | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था | |

## *विद्या प्रसारक मंडळ, ठाणे*

### *उपक्रम*

१) भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला<br>
२) दिशा व्यासपीठ<br>
३) डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान<br>
४) विद्या प्रसारक मंडळ - वर्धापन दिन<br>
५) नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन<br>
६) ५ सप्टेंबर - दीक्षांत समारंभ

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

✰ ३०० आसनांची व्यवस्था

✰ आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा

✰ उपाहाराची व्यवस्था

✰ वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

✰ प्रसन्न वातावरण

संपर्क
कार्यवाह,
विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.